विषय काव्य
नं. ८८७.
१८०४

# भक्ति



चंद्र प

REFBK-0000219
REFBK-0000219

REFBK-0000219

# उपोद्घात.

**धन्य नरदेहाची प्राप्ती । धन्य साधूची संगती ॥**
**धन्य धन्य ते भावार्थी । जे भगवद्भक्तीं रंगले ॥ १ ॥**

—श्रीएकनाथ.

१. भरतखंड ही पुण्यभूमि आहे. या भूमींत ईश्वराचे व ईश्वराच्या परम भक्तांचे अनेक अवतार युगायुगाचे ठायीं झाले आहेत. हा दृश्यपसारा तुच्छ मानून आत्मस्वरूपाच्या ठायीं निरंतर रमणारे महात्मे भरतखंडांत मागें झाले, सध्यां आहेत व पुढें होतील. त्रिगुण व पंचमहाभूतें यांच्या कर्दमापासून उत्पन्न झालेल्या दृश्यसृष्टीच्या मुळाशीं जें एक, अनादि, अविकृत, सर्वगत, चिद्रूप, आत्मतत्व ओतप्रोत भरलेलें आहे त्याचें दर्शन, श्रवण, मनन व निदिध्यास होऊन कृतार्थ होण्याचा मार्ग आपल्या प्राचीन महर्षींनीं घालून दिला व त्या मार्गानें जाऊन असंख्य पुण्यवंत जीव धन्य झाले. आकाशांतल्या असंख्य तारकांप्रमाणें अशा असंख्य विभूती भरतखंडांत होऊन गेल्या. त्यांपैकीं कांहींनीं आपापले स्वानुभव लिहून ठेवले आहेत. आपले अनादि वेदग्रंथ, आत्मतत्वाचें उत्कृष्ट निरूपण करणारे उपनिषद्ग्रंथ, श्रीकृष्णासारख्या परमात्म्याच्या व्यक्तरूपाविषयीं अद्भुत प्रेम उत्पन्न करणारे गीताभागवतादि भक्तिप्रधान ग्रंथ, व यांच्या साह्यानें व सद्गुरुप्रसादानें कृतार्थ झालेल्या भागवतांच्या स्वानुभवपर उक्ति, अमित जीवांना मुक्त होण्याचा मार्ग दाखविण्यास कारण झाल्या आहेत.

२. अर्वाचीन काळीं महाराष्ट्रांतही असे अनेक ब्रह्मनिष्ठ भगवद्भक्त होऊन गेले. ‘ श्रीज्ञानराजें केला उपकार। मार्ग हा निर्धार दाखविला ’ या सेना न्हाव्याच्या उक्ती प्रमाणें त्या सर्वांत श्रीज्ञानेश्वर महाराज हे अग्रेसर होत. श्रीज्ञानेश्वर, श्रीनामदेव, श्रीएकनाथ, श्रीतुकाराम, व श्रीरामदास हें महाराष्ट्रपंचायतन होय. यांनीं व यांच्याच अधिकाराच्या इतर साक्षात्कारी महापुरुषांनीं ज्ञानयोग व कर्मयोग यांशीं अविरुद्ध अशा भक्तिमार्गाचा प्रसार महाराष्ट्रभर केला. ज्ञानेश्वरी ही पुढील पांचशें वर्षांत झाले संतांची आई आहे. ज्ञानेश्वरी व एकनाथी भागवत हे भक्तिमार्गाचे आधार पुढील बहुतेक संतांना यांपासून प्रेरणा झाली आहे. ज्ञानेश्वरी, एकना[illegible] प्रपंचपरमार्थाचें उत्कृष्ट विवरण करणारा दासबोध, नामदेवतुकारामा[illegible]

चरण मनाशीं गुंगत असतां शुद्धचित्त पुरुषाला जो अर्थबोध होतो तो अनेक पुराणें किंवा कीर्तनें ऐकून होणार नाहीं. प्रस्तुत पुस्तक आबालवृद्ध सर्वांच्या उपयोगीं पडेल. मुख्यतः तरुणांस याचा उपयोग अधिक होईल. आईबापांनीं किंवा पालकांनीं हें पुस्तक आपापल्या मुलांस देऊन त्यांच्यासह ईशप्रार्थना करावी म्हणजे स्वतःचें हित साधून मुलांस चांगलें वळण लागेल. पहांटेच्या भूपाळ्या, रात्रीच्या आरत्या, नित्यपाठ वगैरेंचा मनावर सात्विक संस्कार होऊन, मन भक्तिमार्गाकडे वळतें. हा जुना सांप्रदाय उत्तरोत्तर मोडत चालला आहे ही खेदाची गोष्ट आहे, व म्हणून तर असें पुस्तक छापून प्रसिद्ध करणें अवश्य वाटलें. शाळांतूनही मुलांस धर्मशिक्षण देण्यास प्रस्तुत पुस्तकाचा चांगला उपयोग होईल मुलांना घरीं अगर शाळेंत धर्म-शिक्षण देतां यावें म्हणून हें पुस्तक छापखान्यांत पाठविण्याचा खटाटोप केला तो निष्फळ होणार नाहीं अशी आशा आहे. वृद्धतरुणांना, स्त्रीपुरुषांना सर्वांनाच यापासून उपयोग होणार आहे. प्रस्तुत पुस्तक तरुणांचीं मनें सश्रद्ध करून भक्तिमार्गा-कडे वळविण्यास अंशतः तरी साह्यभूत होवो अशी त्या दयाघनाची प्रार्थना करून हा उपोद्घात पुरा करितों.

ल० रा० पांगारकर.

काव्य २१५

# १ प्रातःस्मरण.

**म्हणे दास विश्वास नामीं धरावा**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ १ ॥**

—श्रीरामदास.

भूपाळी गणपतीची.

उठा उठा हो सकळिक वाचे स्मरावा गजमुख ।
ऋद्धिसिद्धींचा नायक सुखदायक भक्तांसीं । सु० दासांसीं ॥ध्रु०॥

अंगीं शेंदुराची उटी माथां शोभतसे कीरिटी ।
केशरकस्तूरी लल्लाटीं कंठीं हार साजिरा ॥ १ ॥

कानीं कुंडलांची प्रभा चंद्रसूर्य जैशी नभा ।
माजी नागबंदी शोभा स्मरतां उभा जवळी तो ॥ २ ॥

कांसे पितांबराची धटी हातीं मोदकाची वाटी ।
रामानंद स्मरतां कंठीं तो संकटीं पावतो ॥ ३ ॥

भूपाळी रामाची.

उठोनियां प्रातःकाळीं । जपा रामनामावळी ।
स्वयें ध्यातो चंद्रमौळी । शैलबाळीसमवेत ॥ ध्रु० ॥

राम योग्यांचें मंडण । राम भक्तांचें भूषण ।
राम धर्माचें रक्षण । संरक्षण दासाचें ॥ १ ॥ ॥ ध्रु० ॥भावें ।

रामें ताटिका मारिली । रामें शिळा उद्धरिली । वें॥१॥
रामें जानकी पर्णिली । गणिका मुक्त ते केली ॥ २ ॥

रामें पाषाण तारिले । रामें दैत्य संहारिले ।
रामें बंदी सोडविले । मुक्त केले सुरवर ॥ ३ ॥

रामें रक्षिलें भक्तांसी । रामें सोडविलें देवांसी ॥
राम दासाचे मानसीं । रामदासीं आनंद ॥ ४ ॥

भूपाळी पंढरीची.

उठा उठा हो वेगेंसीं । चला जाऊं पंढरीसीं ।
भेटों विठ्ठल रखुमाइसीं । त्रिविध ताप हरतील ॥ ध्रु० ॥

चंद्रभागे करूं स्नान । घेऊं पुंडलिकाचें दर्शन ।
तेथें भेटति संतजन । तेणें मन निवेल ॥ १ ॥

गंगा यमुना सरस्वती । कृष्णा वेण्या भागीरथी ।
तुंगभद्रा भोगावती । येती श्रीपतिदर्शना ॥ २ ॥

तापी नर्मदा कावेरी । पंचगंगा गोदावरी ।
स्नानें केलिया बोहरी । महादोष हरतील ॥ ३ ॥

रामानंदाचें माहेर । क्षेत्रनाम पंढरपूर ।
माता पिता विश्वंभर । पैलपार तरतील ॥ ४ ॥

भूपाळी गंगेची.

उठोनियां प्रातःकाळीं वदनीं वदा चंद्रमौळी ।
श्रीबिंदुमाधवाजवळी स्नान करा गंगेचें । स्नान करा गोदेचें ॥ ध्रु०

स्नानदान जया अंतरीं घडेल भागिरथीच्या तिरीं ।
[illegible]रि कृपा करिल त्यावरी ऐसें माहात्म्य गंगेचें ॥ १ ॥

[illegible]रथीचें स्नान करा हृदयीं स्मरोनि गंगाधरा ।
[illegible] चौऱ्यायशींचा फेरा ऐसें माहात्म्य गंगेचें ॥ २ ॥

आहे स्वर्गावरती पाताळीं ते भोगावती ।
[illegible]कीं हे [illegible] ऐसें माहात्म्य गंगेचें ॥ ३ ॥

कृष्णा वेण्या तुंगभद्रा शरयू कालिंदी नर्मदा ।
भीमा भामा मुख्य गोदा करा स्नान गंगेचें ॥ ४ ॥
व्यास वाल्मीकि नारदमुनी अत्रि वसिष्ठ आणि जैमिनी ।
गुरु दत्तात्रेय येति माध्यान्हीं ऐसें माहात्म्य गंगेचें ॥ ५ ॥
आली आषाढी एकादशी चला जाऊं पंढरीसी ।
पाडुरंग चरणापाशीं दावी माहात्म्य गंगेचें ॥ ६ ॥

भूपाळी आत्मारामाची.

उठा उठा प्रातःकाळ झाला । आत्माराम पाहूं चला ।
हा समयो जरि टळला । तरि अंतरला श्रीराम ॥ ध्रु० ॥

जीव शिव दोघे जण । भरत आणि शत्रुघ्न ।
आला बंधु लक्ष्मण । मन उन्मन होऊनी ॥ १ ॥

विवेक वसिष्ठ सद्गुरु । संतसज्जनमुनेश्वरु ।
करिती नामाचा गजरू । हर्षनिर्भर होउनियां ॥ २ ॥

सात्विक सुमंत प्रधान । नगरवासी अवघे जन ।
आला वायूचा नंदन । श्रीचरण पहावया ॥ ३ ॥

माता जानकी विघडिली । होती प्रारब्धें लिहिली ।
तिची देहबुद्धि जाळिली । आलिंगिली श्रीरामें ॥ ४ ॥
आजची दिवाळी दसरा । पर्वकाळ आला घरा ।
रामनंदाच्या दातारा । भेटी माहेरा मज द्यावी ॥ ५ ॥

भूपाळी गोपाळाची.

उठिं रे गोपाळा*! उघडी स्वरूपलोचना ।
सरलि अविद्याराती उदय झाला रविकिरणा ॥ १ ॥
इंद्रियगोधनें नेईं निर्गुणकानना ।
सुटलीं मानसवत्सें तुजविण नाकळती कोणा ॥ ध्रु० ॥भावें ।

* हें रूपक सर्वांगसुंदर आहे.

वें॥१॥

प्रबोध पहांट झाली सरले तिमिरतमरज ।
गुरुकृपेचा अरुण दावी सुरंगसम तेज ॥
आत्मादिनकर पाठी प्रगटे तात्काळिक सहज
जिवचंद्राचें मंडळ तेणें झालें निस्तेज ॥ १ ॥

दृश्यभास चांदणिया असते ठायींच लोपलिया ।
लिंगदेहकमळिंचे मधुकर सुटले आपसया ॥
बुद्धिबोधचक्रवाकें मिनली आपाणियां ।
देहबुद्धिकुमुदिनी सुकोनि गेली विलया ॥ २ ॥

योगविद्येच्या पंथें साधकवृंदें चालियलीं ।
उपनिषद्भागार्थ शब्द केला कोकिळीं ॥
वाग्वादाचे उलूक निघती मौनाचे ढोलीं ।
विकल्प अटवी साहीं चोरीं सांडियली ॥ ३ ॥

निरागरश्मी जवळी धरितां चित्तरविकांत ।
आत्मावन्हि प्रगटे विषयवन हें जाळीत ॥
तृष्णेच्या श्वापदावरी प्रळय अद्भूत ।
विश्व हें लटिकें मूढां मृगजळवत ॥ ४ ॥

जारव्यसनीं जिव हा झाला उदमी सुविचार ।
वासनाकुंटिणिचा सहजें खुंटला व्यापार ॥
लीलाविश्वंभरस्वामी उठिला सत्वर ।
चाले मुक्तेश्वर संगीं धरूनियां कर ॥ ५ ॥

अभंग.

१

…ा भागीरथी । कृष्णा सरस्वती तुंगभद्रा ॥ १ ॥
…ळोवेळां साचे । नाहीं भय साचें प्राणियांसी ॥ २ ॥
… पापी उद्धरती । दर्शनेंचि होती मुक्ति प्राप्त ॥ ३ ॥
…ामीं एकनिष्ठभाव । तेथें वासुदेव सर्वकाळ ॥ ४ ॥

२

प्रात:काळीं नाम पवित्रचि घ्यावें । तेणें विसरावें जन्ममृत्य ॥ १ ॥
नळ युधिष्ठिर जनक जनार्दन । स्मरणेंचि धन्य होती प्राणी ॥ २ ॥
न करा आळस नाम घेतां वाचे । नाहीं भय साचें प्राणियासी ॥३॥
तुका म्हणे वाचे गाईल गोविंद । होय परमानंद नामें एक ॥ ४ ॥

ज्ञानेश्वरी हरिपाठ.

१

संतांचे संगतीं मनोमार्गें गती । आकळावा श्रीपती वेगें पंथें ॥ १ ॥
रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा । आत्मा जो शिवाचा राम जपे॥२॥
एकतत्व नाम साधिती साधन । द्वैताचें बंधन न बाधीजे ॥ ३ ॥
नामामृतगोडी वैष्णवां लाधली । योगियां साधली जीवनकळा ॥४॥
सत्वर उच्चार प्रऱ्हादीं बिंबला । उद्धवा लाधला कृष्णदाता ॥ ५ ॥
ज्ञानदेव म्हणे नाम हें सुलभ । सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे ॥ ६ ॥

२

जपतपकर्मक्रियानेमधर्म । सर्वां घटीं राम भावशुद्ध ॥ १ ॥
न सोडीं रे भावो टाकीं रे संदेहो । रामकृष्णीं टाहो नित्य फोडीं ॥ २ ॥
जातवित्तगोत कुळशीळमात । भजें कां त्वरित भावनायुक्त ॥ ३ ॥
ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं । तेणें वैकुंठभुवनीं घर केलें ॥ ४ ॥

३

काळवेळ नाम उच्चारितां नाहीं । दोन्हीं पक्ष पाहीं उद्धरती ॥ १ ॥
रामकृष्णनाम सर्वां दोषां हरण । जडजीवां तारण हरि एक ॥ २ ॥
हरिनाम सार जिव्हा या नामाची । उपमा त्या दैवाची कोण मानी ३
ज्ञानदेवा सांग झाला नामपाठ । पूर्वजां वैकुंठमार्ग सोपा ॥ ४ ॥

मनास बोध.

मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें । तरी देव तो पाविजेतो स्वभावें ।
जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें । जनीं वंद्य तें सर्व भावें करावें॥१॥

मना वासना दुष्ट कामा नये रे । मना सर्वथा पापबुद्धी नको रे ।
मना सर्वथा नीति सोडूं नको हो । मना अंतरीं सारवीचार* राहो ॥२॥

नको रे मना क्रोध हा खेदकारी । नको रे मना काम नानाविकारी ।
नको रे मना सर्वदा अंगिकारूं । नको रे मना मत्सरू दंभभारू ॥३॥

मना श्रेष्ठ धारिष्ठ जीवीं धरावें । मना बोलणें नीच सोशीत जावें ।
स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावें । मना सर्व लोकांसि रे नीववावें ॥४॥

देह त्यागितां कीर्ति मागें उरावी । मना सज्जना हेचि क्रीया करावी ।
मना चंदनाचे परी त्वां झिजावें । परी अंतरीं सज्जना नीववावें ॥५॥

सदा सर्वदा प्रीति रामीं धरावी । दुखाची स्वयें सांड जीवीं करावी ।
देहदुःख तें सूख मानीत जावें । विवेकें सदा स्वस्वरूपीं भजावें ॥६॥

जगीं सर्वसूखी असा कोण आहे । विचारी मना तूंचि शोधूनि पाहें ।
मना त्वांचि रे पूर्वसंचीत केलें । तयासारिखें भोगणें प्राप्त झालें ॥७॥

मना मानसीं दुःख आणूं नको रे । मना सर्वथा शोकचिंता नको रे ।
विवेकें देहबुद्धि सोडूनि द्यावी । विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी ॥८॥

मरे एक त्याचा दुजा शोक वाहे । अकस्मात तोही पुढें जात आहे ।
पुरेना जनीं लोभ रे क्षोभ होतो । म्हणोनी जनीं मागुता जन्म घेतो ॥

मना मानसीं व्यर्थ चिंता वहातें । अकस्मात होणार होवोनि जातें ।
घडे भोगणें सर्वही कर्मयोगें । मतीमंद तो खेद मानी वियोगें ॥१०॥

मना वासना चूकवीं येरझारा । मना कामना सोडवीं द्रव्यदारा ।
मना यातना थोर हे गर्भवासी । मना सज्जना भेटवीं राघवासी ॥११॥

सदा सर्वदा देव सन्नीध आहे । कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहें ।
सुखानंद आनंद कैवल्यदानी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी १२

मना रे जनीं मौन्यमुद्रा धरावी । कथा आदरें राघवाची करावी ।
नसे राम तें धाम सोडोनि द्यावें । सुखालागिं आरण्य सेवीत जावें ।

---

* माया असार, ब्रह्म सार, त्या ब्रह्माचें चिंतन.

सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा । सदा रामनामें वदे नित्य वाचा ।
स्वधर्मीचि चाले सदा उत्तमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥

सदा बोलण्यासारिखें चालताहे । अनेकीं सदा एक देवासि पाहे ।
सगूणीं भजे लेश नाहीं भ्रमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥

क्रमी वेळ जो तत्वचिंतानुवादें । न लिंपे कदा दंभवादें विवादें ।
करी सूखसंवाद जो ऊगमाचा*। जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥

दिनाचा दयाळू मनाचा मवाळू । स्नेहाळू कृपाळू जगीं दासपाळू ।
जया अंतरीं क्रोधसंताप कैंचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥

न वेंचे कदा ग्रंथिंचा अर्थ कांहीं । मुखें नाम उच्चारितां कष्ट नाहीं ।
महा घोर संसारशत्रू जिणावा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥

नव्हे कर्म ना धर्म ना योग कांहीं । नव्हे भोग ना त्याग ना सांग कांहीं ।
म्हणे दास विश्वास नामीं धरावा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा॥

बहू चांगलें नाम या राघवाचें । अती साजिरें स्वल्प सोपें फुकाचें ।
करी मूळ निर्मूळ घेतां भवाचें । जिवा मानवां हेंचि कैवल्य साचें ॥

जनीं भोजनीं नाम वाचे वदावें । अती आदरें नाम घोषें म्हणावें ।
हरीचिंतनीं अन्न सेवीत जावें । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ॥२१॥

हरीकीर्तनीं प्रीति भावें धरावी । देहबुद्धि नीरूपणीं वीसरावी ।
परद्रव्य आणीक कांता परावी । यदर्थीं स्वयें सांड जीवीं करावी ॥२२॥

विवेकें क्रिया आपुली पालटावी । अती आदरें शुद्ध क्रीया धरावी ।
जगीं बोलण्यासारिखें चाल बापा । मना कल्पना सोड संसारतापा ॥

बरी स्नानसंध्या करीं एकनिष्ठा । विवेकें मना आवरीं स्थानभ्रष्टा ।
दया सर्वभूतीं जया मानवाला । सदा प्रेमळू भक्तिभावें निवाला॥२४॥

तुटे वाद संवाद तेथें करावा । विवेकें अहंभाव हा पालटावा ।
जनीं बोलण्यासारिखें आचरावें । क्रियापालटें भक्तिपंथेंचि जावें॥२५॥

---

* आदिपुरुषाचा, आत्मतत्वाचा.

फुकाचे मुखीं बोलतां काय वेंचे । दिसंदीस अभ्यंतरीं गर्व सांचे ।
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे । विचारीं मना तूंचि शोधोनि पाहें२६

जगीं धन्य तो राममूखीं निवाला । कथा ऐकतां सर्व तल्लीन झाला ।
देहभावना रामबोधें उडाली । मनोवासना रामरूपीं विराली ॥ २७ ॥

विचारूनि बोले विवंचूनि चाले । तयाचेनि संतप्त तेही निवाले ।
बरें शोधिल्यावीण बोलों नये हो । जनीं बोलणें शुद्ध नेमस्त राहो॥२८

नसे गर्व अंगीं सदा वीतरागी । क्षमाशांति भोगी दयादक्ष योगी ।
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा । अशा लक्षणीं जाणिजे योगिराणा२९

दिसे लोचनीं तें नसे कल्पकोडी । अकस्मात आकारलें काळ मोडी ।
पुढें सर्व जाईल कांहीं न राहे । मना संत आनंत शोधोनि पाहें ॥३०॥

जेणें मक्षिका भक्षिली जाणिवेची । तया भोजनाची रुची प्राप्त कैची ।
अहंभाव ज्या मानसींचा विरेना । तया ज्ञान हें अन्न पोटीं जिरेना॥३१॥

अहंतागुणें सर्वही दुःख होतें । मुखें बोलिलें ज्ञान तें व्यर्थ जातें ।
सुखें राहतां सर्वही सूख आहे । अहंतागुणें तूंचि शोधोनि पाहें॥३२॥

अहंतागुणें नीति सांडी विवेकी । अनीतीबळें श्लाघ्यता सर्व लोकीं ।
परी अंतरीं सर्वही साक्ष येते । प्रमाणांतरीं बुद्धि सांडोनि जाते॥३३॥

देहबुद्धिचा निश्चयो दृढ झाला । देहातीत तें हीत सांडीत गेला ।
देहबुद्धि ते आत्मबुद्धि करावी । सदा संगती सज्जनाची करावी॥३४॥

देहबुद्धि ते स्वामिबोधें त्यजावी । विवेकें तया वस्तुची भेट घ्यावी ।
तदाकार हे वृत्ति नाहीं स्वभावें । म्हणोनी सदा तेचि शोधीत जावें॥

तिन्ही लोक जेथूनि निर्माण झाले । तया देवरायासि कोणी न बोले ।
जगीं थोरला देव तो चोरिलासे । गुरूवीण तो सर्वथाही न दीसे ३६

मनीहूनियां टाकिला सर्व हेवा । सदा सर्वदा आचरी नीचसेवा ॥
गुरूचे घरीं झाडितो सारवीतो । मला तो गमे भूतळींचा रवी तो ३७

अ. क्र. - २२४



करी वृत्ति जो संत तो संत जाणा। दुराशागुणें जो नव्हे दैन्यवाणा।
उपाधी देहेबुद्धितें वाढवीतो। परी सज्जना केंवि बाधूं शके तो॥३८॥

न जाये जपासी न जाये तपासी। न जायेचि काशी न जाये गयेसी।
गुरुचिंतनेवीण कोठें न जाये। त्रिकाळीं सदा पाय तूझेचि पाहे॥३९॥

मना गूज रे तूजला प्राप्त झालें। परी पाहिजे अंतरीं यत्न केले।
सदा श्रवणें पाविजे निश्चयासी। धरीं संगती सज्जनीं धन्य होसी॥४०॥

सुविचारमाला.

प्रापंचीं ममता कधीं धरूं नको, लोभांत गुंतूं नको।
लोकीं तूं खळ दुष्ट नष्ट, भलत्या संगांत बैसूं नको॥
कांहीं कर्म* करूं नको, गुरुमहापंथासि मोडूं नको।
जो कोणी भवदुःख सर्व निरसी तो देव सोडूं नको॥ १॥

संसारीं असतां प्रवाहपतितद्वंद्वांसि त्रासूं नको।
खेदाखेद मनांत आणुनि वनीं जाणें विचारूं नको॥
कर्णीं दुष्ट कठोर शब्द पडती तें दुःख मानूं नको।
भोगें दुःखसुखादि सारुनि निजानंदास भंगूं नको॥ २॥

लाभीं हर्ष नको, विषादहि नको, निंदा प्रशंसा नको।
हानीचा मनिं शोक तूं धरूं नको, देहीं अहंता नको॥
कोणाचें इतिकृत्य तें स्मरुं नको, माझें तुझें हें नको।
आप्तासी ममता नको, गुरुपरब्रह्मासि सोडूं नको॥ ३॥

प्रारब्धीं सुखभोगयोग नसतां तें दैन्य मानूं नको।
इंद्राची बहु संपदा गणुं नको, क्षुद्रार्थ वांछूं नको,॥
देहाचें कृतकर्मदुःख अपुलें कोणास सांगूं नको।
भूलोकांत महाप्रसंग पडतां तूं सत्व सोडूं नको॥ ४॥

---

* सकाम कर्म.

मायामोह नको, सुसंग असतां सोडूनि जाऊं नको ।
चिंताशोक नको, परार्थ करितां लोकांस लाजूं नको ॥
वर्मोच्चार नको, जनांत बसतां गोष्टी भवाच्या नको ।
चित्तीं राग नको अनावर, खरें वैराग्य सोडूं नको, ॥ ५ ॥

नानाचार नको, कुकर्म करणें हें क्षुद्रबुद्धी नको,
मायाकल्पित वित्तवाजिकरि हे भोगार्थ वांछूं नको, ।
कायक्लेश नको, जनीं मुढ अशा संगांत बैसूं नको,
'जेथें जाउनि येत ना मुनि कदां तें धाम'* सोडूं नको ॥ ६ ॥

—नारायणबोवा.

## खरा प्रपंचत्याग.

त्यजिलें ते काय कासया म्हणिजे । सांग पा मज मजपाशीं ऐसें ।
जया भेणें तूं जाशी वनांतरा । तें तंव तुजचि सरिसे रया ॥ ध्रु० ॥

घरदार वो खेद त्यजूं म्हणसी । तरी शरीराएवढे जाड ।
मायबाप वोखटीं त्यजूं म्हणसी । तरी अहंकार अविद्येचें कोड ॥
बंधू सखे त्यजूं म्हणसी । तरी काम क्रोधमदमत्सर अवघड ।
बहिणी पाठीच्या त्यजूं म्हणसी । आशा तृष्णा माया अवघड रया॥१॥

स्त्री वोखटी त्यजूं म्हणसी । तरी इंद्रियांसीं नाहीं निवृत्ती ।
सकळ गणगोत त्यजूं म्हणसी । तरी हे अष्टधा प्रकृती ॥
अवघेंचि त्यजूं पाहें म्हणसी । तरी मना नाहीं निजशांती रया ॥२॥

अवघेंच तुजजवळि दुमदुमित असतां । वरिवरि मुंडिसि कां करिसि
विटंबना ॥ सहज संतोषें असूनि जैसा । तैसा परितो सद्गुरु पावे
खुणा ॥ आपुले आश्रमीं स्वधर्मीं असतां । सर्वत्र एकुचि जाणा ॥
बाप रखुमादेवीवर विठ्ठलु । इतुकियासाठीं नेईल वैकुंठभुवना ॥ ३ ॥

—ज्ञानेश्वर.

---

* यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ।

## स्फुट अभंग.

१

ऐसें असावें संसारीं । जोंवरि प्राचीनाची दोरी ॥ १ ॥
पक्षी आंगणासी आले । आपुला चारा चरोनि गेले ॥ २ ॥
मुलीं घरचार मांडला । खेळ मोडोनी टाकिला ॥ ३ ॥
वाटसरू वाटा आले । प्रातःकाळीं उठोनि गेले ॥ ४ ॥
मार्गीं बहुसाळ भेटले । तेथें मन नाहीं गुंतलें ॥ ५ ॥
एका विनवी जनार्दना । ऐसें असतां भय कोणा ॥ ६ ॥

२

निंदक कामाचा कामाचा । गडी आत्मारामाचा ॥ निंदक०॥ध्रु०॥
निंदक आमुची गंगा । आमुचीं पातकें नेते भंगा ॥ १ ॥
निंदक आमुची काशी । आमुचीं पातकें अवघें नाशी ॥ २ ॥
निंदक आमुचा सखा । आमुचीं वस्त्रें धुतो फुका ॥ ३ ॥
निंदक आमुचा गुरू । एका जनार्दनीं थोरू ॥ ४ ॥

३

जन हे सुखाचे दिल्या घेतल्याचे । बा अंतकाळींचें नाहीं कोणी ॥१॥
झाल्या शक्ती हीन नाकडोळे गळती । सांडोनियां पळती रांडापोरें ॥२॥
बाइल म्हणे खर मरता तरी बरें । नासलें हें घर थुंकोनीयां ॥ ३ ॥
तुका म्हणे माझीं न होत हीं कोणी । तुज चक्रपाणीवांचोनीयां ॥ ४ ॥

४

देव भक्तालागीं करूं नेदी संसार । अंगें वारावार करोनि ठेवी ॥१॥
भाग्य द्यावें तरी अंगीं भरे ताठा । म्हणोनि करंटा करोनी ठेवी॥२॥
स्त्री द्यावी गुणवंती नसती गुंते आशा । यालागीं कर्कशा पाठी लावी ॥
तुका म्हणे मज प्रचीत आली देखा । आणीक या लोकां काय सांगों ॥

५

मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचें कारण ॥
मोक्ष अथवा बंधन । सुखसमाधान इच्छा ते ॥ ध्रु० ॥

मनें प्रतिमा स्थापिली । मनें मना पूजा केली ॥
मनें इच्छा पुरविली । मन माउली सकळांची ॥ १ ॥
मन गुरु आणि शिष्य । आपुलेंचि करी दास्य ।
प्रसन्न आपआपणांस । गती अथवा अधोगती ॥ २ ॥
साधक वाचक पंडित । श्रोते वक्ते ऐका मात ।
नाहीं नाहीं आन दैवत । तुका म्हणे दूसरें ॥ ३ ॥

६

काळ जातो क्षणक्षणा । मूळ येईल मरणा ॥ १ ॥
कांहीं धांवाधांवा करीं । जंव तो काळ आहे दुरी ॥ २ ॥
देह आहे जाईजणें । भुललासी कवण्या गुणें ॥ ३ ॥
मायाजाळीं गुंतलें मन । परी हें दुःखासी कारण ॥ ४ ॥
सत्य वाटतें सकळ । परी जातां नाहीं वेळ ॥ ५ ॥
रामीं रामदास म्हणे । आतां सावधान होणें ॥ ६ ॥

७

सुखाचे सांगाती सर्वही मिळती । दुःख होतां जाती निघोनियां ॥१।
निघोनीयां जाती संकटाचे वेळे । सुख होतां मिळे समुदाय ॥ २ ॥
समुदाय सर्व देहाचे संबंधी । तुटली उपाधी रामदासीं ॥ ३ ॥

८

होचि थोर भक्ती आवडती देवा । संन्यासावी माया संसाराची ॥ १ ।
ठेविलें अनंतें तैसेंची राहावें । चित्तीं असों द्यावें समाधान ॥ २ ॥
वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ । भोगणें तें फळ संचिताचें ॥ ३ ।
तुका म्हणे घालूं तयावरी भार । वाहूं हा संसार देवापायीं ॥ ४ ॥

९

देह तंव असे भोगाचे आधीन । याचें सुख क्षीण क्षणभंगुर ॥ १ ॥
अविनाश जोडी देवापाशीं भाव । कल्याणाचा ठाव सकळही ॥ २ ॥
क्षणभंगुर हा येथील पसारा । आलिया आकारा अवघें नासे ॥३॥
तुका म्हणे येथें सकळ विश्रांती । आठवावा चित्तीं नारायण ॥ ४ ॥

उपसंहार.

घालिन लोटांगण वंदीन चरण डोळ्यांनीं पाहिन रूप तुझें ।
प्रेमें आलिंगिन अनंत पूजिन भावें ओवाळिन म्हणे नामा ॥ १॥

त्वमेव माता पिता त्वमेव त्वमेव बंधुः सकलँस्त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव त्वमेव सर्वं मम देवदेव ॥ २ ॥

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुद्ध्यात्मना वानुसृतस्वभावात् ।
करोति यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पयेत्तत् ॥ ३ ॥

अच्युतं केशवं रामनारायणं कृष्णदामोदरं वासुदेवं हरिम् ।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं जानकीनायकं रामचंद्रं भजे ॥ ४ ॥

काशीक्षेत्रं शरीरं त्रिभुवनजननी व्यापिनी ज्ञानगंगा ।
भक्तिश्रद्धा गयेयं निजगुरुचरणध्यानयोगः प्रयागः ।
विश्वेशोयं तुरीयः सकलजनमनःसाक्षिभूतोंतरात्मा ।
देहे गेहे मदीयं यदि वसति पुनस्तीर्थमन्यत्किमस्ति ॥ ५ ॥

आलोड्य सर्वशास्त्राणि विचार्यैव पुनःपुनः ।
इदमेकं सुनिष्पन्नं ध्येयो नारायणः सदा ॥ ६ ॥

करचरणकृतं वाक्कायजं कर्मजं वा श्रवणनयनजं वा मानसं वाऽपराधम् ।
विहितमविहितं वा सर्वमेतत्क्षमस्व जय जय करुणाब्धे श्रीमहादेव शंभो॥

लाभस्तेषां जयस्तेषां कुतस्तेषां पराजयः ।
येषामिंदीवरश्यामो हृदयस्थो जनार्दनः ॥ ८ ॥

आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदाम् ।
लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम् ॥ ९ ॥

आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ।
सर्वदेवनमस्कारः केशवं प्रति गच्छति ॥ १० ॥

नमस्ते पुरुषाध्यक्ष नमस्ते भक्तवत्सल ।
नमस्तेऽस्तु हृषीकेश नारायण नमोऽस्तु ते ॥ ११ ॥

हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥ १२ ॥
नारायण नारायण जय गोविंद हरे ।
नारायण नारायण जय गोपाल हरे ॥ १३ ॥
जय पुंडलीकवरदे हरिविठ्ठल । ज्ञानदेव तुकाराम ॥

# २ ईश्वरस्तुति.

बुद्धीचें वैभव अन्य नाहीं दुजें ।
एकया केशीराजें सकळ सिद्धी ॥ १ ॥

—श्रीज्ञानेश्वर.

करुणाष्टकें.

१

अनुदिनिं अनुतापें तापलों रामराया ।
परमदिनदयाळा नीरसीं मोहमाया ॥
अचपळ मन माझें नावरे आवरीतां ।
तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां ॥ १ ॥

भजनरहित रामा सर्वही जन्म गेला ।
स्वजनजनधनाचा व्यर्थ म्यां स्वार्थ केला ॥
रघुपति मति माझी आपुलीसी करावी ।
सकळ त्यजुनि भावें कांस तूझी धरावी ॥ २ ॥

तनुमनधन माझें राघवा रूप तूझें ।
तुजविण मज वाटे सर्व संसार ओझें ॥
प्रचलित न करावी सर्वथा बुद्धि माझी ।
अचळ भजनलीला लागली आस तूझी ॥ ३ ॥

चपळपण मनाचें मोडितां मोडवेना ।
सकळ स्वजनमाया तोडितां तोडवेना ॥
घडि घडि विघडे हा निश्चयो अंतरींचा ।
म्हणवुनि करुणा हे बोलतों दीनवाचा ॥ ४ ॥

जळत हृदय माझें जन्म कोट्यानुकोटी ।
मजवरि करुणेचा राघवा पूर लोटीं ॥
तळमळ निववीं रे रामकारुण्यसिंधू ।
षड्रिपु कुळ माझें तोडिं याचा समंधु ॥ ५ ॥

स्वजनजनधनाचा कोण संतोष आहे ।
रघुपतिविण आतां चित्त कोठें न राहे ॥
जिवलग जिव घेती प्रेत सांडोनि जाती ।
विषय सकळ नेती मागुता जन्म देती ॥ ६

सकळ जन भवाचे आथिले वैभवाचे ।
जिवलग मज कैंचे चालते हेच साचें ॥
विलग विषमकाळीं सांडिती सर्व माळीं* ।
रघुविर सुखदाता सोडवी अंतकाळीं ॥ ७ ॥

उपरति मज रामीं जाहली पूर्णकामीं ।
सकळजनविरामीं राम विश्रामधामीं ॥
घडिघडि मन आतां रामरूपीं भरावें ।
रघुकुळटिळका रे आपुलेसें करावें ॥ ८ ॥

२

नसे भक्ति ना ज्ञान ना ध्यान कांहीं
नसे प्रेम हें रामविश्राम नाहीं ।
असा दीन अज्ञान मी दास तूझा
समर्था जनीं घेतला भार माझा ॥ १ ॥

रघूनायका जन्मजन्मांतरींचा
अहंभाव छेदोनि टाकीं दिनाचा ।
जनीं बोलती दास या राघवाचा
परी अंतरीं लेश नाहीं तयाचा ॥ २ ॥

* माळावर.

रघूनायका दीन हातीं धरावें
अहंभाव छेदोनियां उद्धरावें ।
अगूणी तयालागिं गूणी करावें
समर्थें भवसागरीं उतरावें ॥ ३ ॥

किती भार घालूं रघूनायकाला
मजकारणें शीण होईल त्याला ।
दिनानाथ हा संकटीं धाव घाली
तयाचेनि हे सर्व काया निवाली ॥ ४ ॥

मला कायसा राम कैवल्यदाता
तयाचेनि हे फीटली सर्व चिंता ।
समर्थां तया काय उत्तीर्ण व्हावें
सदा सर्वदा नाम वाचे वदावें ॥ ५ ॥

दिनाचें उणें दीसतां लाज कोणा
जनीं दास दीसे तुझा दैन्यवाणा ।
शिरीं स्वामि तूं राम पूर्णप्रतापी
तुझा दास पाहे सदा शीघ्रकोपी ॥ ६ ॥

३

युक्ति नाहीं बुद्धि नाहीं विद्या नाहीं विवेकिता ।
नेणता भक्त मी तूझा बुद्धि दे रघुनायका ॥ १ ॥
बोलतां चालतां ये ना कार्यभाग कळेचि ना ।
बहु मी पीडिलों लोकीं बुद्धि दे रघुनायका ॥ २ ॥
तुझा मी टोणपा झालों कष्टलों बहुतापरी ।
सौख्य तें पाहतां नाहीं बुद्धि दे रघुनायका ॥ ३ ॥
नेटकें लिहितां ये ना वाचितां चुकतों सदा ।
अर्थ तो सांगतां ये ना बुद्धि दे रघुनायका ॥ ४ ॥

प्रसंग वेळ तर्केना सुचेना दीर्घसूचना ।
मैत्रिकी राखितां ये ना बुद्धि दे रघुनायका ॥ ५ ॥
संसार नेटका नाहीं उद्वेगो वाटतो जिवीं ।
परमार्थू कळेना कीं बुद्धि दे रघुनायका ॥ ६ ॥
उदास वाटतें जीवीं आतां जावें कुणीकडे ।
तूं भक्तवत्सला रामा बुद्धि दे रघुनायका ॥ ७ ॥
कायावाचामनोभावें तुझा मी म्हणवीतसें ।
हे लाज तूजला माझी बुद्धि दे रघुनायका ॥ ८ ॥
मुक्त केल्या देवकोटी भूभार फेडिला बळें ।
भक्तांसि आश्रयो मोठा बुद्धि दे रघुनायका ॥ ९ ॥
उदंड भक्त तुम्हांला आम्हांला कोण पूसतें ।
ब्रीद हें राखणें आधीं बुद्धि दे रघुनायका ॥ १० ॥
उदंड ऐकिली कीर्ती पतीतपावना प्रभो ।
मी एक रंक दुर्बुद्धि बुद्धि दे रघुनायका ॥ ११ ॥
आशा हे लागली मोठी दयाळू बा दया करीं ।
आणखी नलगे कांहीं बुद्धि दे रघुनायका ॥ १२ ॥
रामदास म्हणे माझा संसार तुज लागला ।
संशयो वाटतो पोटीं बुद्धि दे रघुनायका ॥ १३ ॥

४

उदासीन हे वृत्ति जीवीं धरावी । अती आदरें सर्व सेवा करावी ।
सदा प्रीति लागो तुझे गूण गातां । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ १ ॥
तुझें रूप हें लोचनीं म्यां पहावें । तुझे गूण गातां मनासीं रमावें ।
उठो आवडी भक्तिपंथेंचि जातां । रघू० ॥ २ ॥
मनीं वासना भक्ति तूझी करावी । कृपाळूपणें राघवें पूरवावी ।
वसावें मदीयांतरीं नाम घेतां । रघू० ॥ ३ ॥

सदा सर्वदा योग तूझा घडावा । तुझे कारणीं देह माझा पडावा ।
उपेक्षूं नको गूणवंता अनंता । रघू० ॥ ४ ॥

नको द्रव्यदारा नको येरझारा । नको मानसीं ज्ञानगर्वे फुगारा ।
सगूणीं मला लाविं रे भक्तिपंथा । रघू० ॥ ५ ॥

भवें तापलों प्रीतिछाया करावी । कृपासागरें सर्व चिंता हरावी ।
मला संकटीं सोडवावें समर्था । रघू० ॥ ६ ॥

मनीं कामना कल्पना ते नसावी । कुबुद्धी कुडी वासना नीरसावी ।
नको संशयो तोडिं संसारवेथा । रघू० ॥ ७ ॥

समर्थापुढें काय मागूं कळेना । दुराशा मनीं बैसली हे ढळेना ।
तुटे संशयो नीरसीं सर्वचिंता । रघू० ॥ ८ ॥

ब्रिदा कारणें दीन हातीं धरावें । म्हणे दास भक्तांसि रे उद्धरावें ।
सुटे ब्रीद आम्हांसि सोडोनि जातां । रघू० ॥ ९ ॥

५

विश्वाद्या! करुणाकरा! बहुत मी योनी पहा हिंडलों ।
कोठेंही सुख पाहिलें न नयनीं नानापरी दंडलों ॥
कांहीं पुण्य उभारितों अवचटें आलों नृदेहाप्रती ।
आतां जन्म पुन्हां नको रघुपते दे मुक्ति कीं शीघ्र ती ॥ १ ॥
रामा! मी तव दासदास म्हणवीं, मातें कशाचें भय! ।
रामा! जाइन जे स्थळीं सुखघना! होईल तेथें जय ॥
रामा! या भुवनत्रयीं तुजविणें नाहीं दुजा तारक ।
रामा! तूं सकळार्थ पूर्ण करिसी तूं तात मी बाळक ॥ २ ॥

न जाणें मी पूजा, न मज समजे ध्यान करणें ।
न जाणें रूपातें, न कळत कशी प्रीति धरणें ॥
न जाणें पायांतें, न मज तरि सत्संग घडला ।
तुझे नामीं रामा! दिननिशिं मम प्राण जडला ॥ ३ ॥

ज्या कीर्तनें नारद धन्य केला। ज्या कीर्तनें वाल्मिकि मुक्ति नेला।
ज्या कीर्तनें 'तारिसि' घोष ऐसा। त्या कीर्तना सांडिन सांग कैसा॥
तूं सेव्य मी सेवक योग्य नातें। तूं गेय मी गायक, तारिं मातें।
तूं जाप्य मी जापक पूर्णकामा। सायुज्यदाता तरि तूंचि रामा॥ ५॥

स्तंभावांचुनि हें उभें नभ असे, पृथ्वी जळीं कीं तरे।
देहो हा बहु छिद्रभग्न असतां त्यामाजि वायू ठरे॥
ऐसे खेळ अचाट दावुनि पहा तूं भिन्न सर्वांहुनी।
तूतें स्वानुभवें विलोकिति जगीं नैराश्यवेत्ते मुनी॥ ६॥

कोठें माहिषअंतरांत शिरुनी वेदांतही बोलसी।
स्कंधीं कावड वाहसी, निजमुखें कोणापुढें जेविसी॥
कोठें कागद तारिसी, दळिसि तूं, कोठें पशू ओढिसी।
कोणाचें रिण वारिसी, परि मला कां हातिंचा सोडिसी॥७॥

ते धन्य जे तुज निरंतर चिंतिताती
ते धन्य जे तव गुणांस अखंड गाती।
ते धन्य जे सतत बोधनिं पूर्ण झाले
ते धन्य जे तुजचि पावुनियां निवाले॥ ८॥

—पांडुरंग कवि.

६

रामा! श्लोकें अनंतें स्तविति मुनि तुला व्यासवाल्मीकि ऐसे
पुण्यश्लोका! तुझ्या या स्तवनिं पुरवती हे शतश्लोक कैसे?।
सूर्यातें काडवाती करुनि उजळिजे सागरा अर्घ्य दीजे
तैसा सद्भाव अंगीकरुनि मज विभू या जगीं धन्य कीजे॥ १॥

झाली सौंदर्यसीमा तव वपु घडतां शिल्पसीमा विधीची
झाली माधुर्यसीमा मुखकमळभवा वाक्यमुक्ताफळांची।
दोर्दंडीं शौर्यसीमा पदकमळवरी दीनसंतारणाची
झाली सद्भाग्यसीमा तव गुणगणनीं योजितां बुद्धि साची॥ २॥

निरंजनमाधव.

## अभंग नामदेवाचे.

१

बोलूं ऐसे बोल । जेणें बोलें विठ्ठल डोले ॥ १ ॥
प्रेम सर्वांगाचे ठायीं । वाचे विठ्ठलरखुमाई ॥ २ ॥
नाचूं कीर्तनाचे रंगीं । ज्ञानदीप लावूं जगीं ॥ ३ ॥
परेहूनि परतें घर । तेथें राहूं निरंतर ॥ ४ ॥
सर्व सत्ता आली हातां । नामयाचा खेचर दाता ॥ ५ ॥

२

आपुली पदवी सेवकांसी द्यावी । तो एक गोसावी पांडुरंग ॥ १ ॥
भावाचा आळुका भुलला भक्तिसुखा । सांपडला फुका नामासाठीं २
प्रेमाचा जिव्हाळा नामाची आवडी । क्षणएक न सोडी संग त्याचा ३
नामा म्हणे आम्हां दीनाचें माहेर । तो एक उदार पांडुरंग ॥ ४ ॥

३

तुझिया सत्तेनें वेदांसी बोलणें । सूर्यासी चालणें तुझिया बळें ॥ १ ॥
ऐसा तूं समर्थ ब्रह्मांडाचा धनी । वर्म हें जाणुनी शरण आलों ॥ २
मेघांनीं वर्षावें पर्वतीं बैसावें । वायूनें विचरावें सत्ते तुझे ॥ ३ ॥
नामा म्हणे कांहीं न हाले साचार । प्रभू तूं निर्धार पांडुरंगा ॥ ४ ॥

४

देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो ॥ १ ॥
चरण न सोडीं सर्वथा । आण तुझी पंढरीनाथा ॥ २ ॥
वदनीं तुझें मंगळनाम । हृदयीं अखंडीत प्रेम ॥ ३ ॥
नामा म्हणे केशवराजा । केला पण चालवी माझा ॥ ४ ॥

५

अमृताहूनि गोड नाम तुझें देवा । मन माझें केशवा कां बा नेघे॥१।
सांग पंढरिराया काय करूं यासी । कां रूप ध्यानासी न ये तुझें २
कीर्तनीं बैसतां निद्रें जागवीलें । मन माझें गुंतलें विषयसुखा ॥ ३
हरिदास गर्जती हरिनामाच्या कीर्ती । नये माझ्या चित्तीं नामा म्हणे

६

पंढरीचा वास चंद्रभागे स्नान । आणीक दर्शन विठोबाचें ॥ १ ॥
हेंचि मज घडो जन्मजन्मांतरीं । मागणें श्रीहरी नाहीं दुजें ॥ २ ॥
मुखीं सदा नाम संतांचें दर्शन । जनीं जनार्दन ऐसा भाव ॥ ३ ॥
नामा म्हणे नित्य तुझे महाद्वारीं । कीर्तन गजरीं सप्रेमाचें ॥ ४ ॥

७

तूं माझी माउली मी वो तुझा तान्हा। पाजी प्रेमपान्हा पांडुरंगे ॥१॥
तूं माझी माउली मी तुझें वासरूं । नको पान्हा चोरूं पांडुरंगे ॥२॥
तूं माझी हरिणी मी तुझें पाडस । तोडीं भवपाश पाडुरंगे ॥ ३ ॥
तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज । चारा घालीं मज पांडुरंगे ॥ ४ ॥
नामा म्हणे होसी भक्तीचा वल्लभ । मागें पुढें उभा सांभाळिसी॥५॥

८

माझे मनोरथ पूर्ण कीजे देवा । केशवा माधवा नारायणा ॥ १ ॥
नाहीं नाहीं मज आणिक सोयरा । न करीं अव्हेरा पांडुरंगा ॥ २ ॥
अनाथाचा नाथ होसी तूं दयाळ । किती वेळोवेळ प्रार्थूं आतां ॥ ३ ॥
नामा म्हणे जीव होतो कासावीस । केली तुझी आस आतां तरी ॥ ४ ॥

९

तुझें प्रेम माझे हृदया आवडी । चरण मी न सोडीं पांडुरंगा ॥ १ ॥
इंद्रियांचे व्यापार अवघेचि तोडीं । प्रेमरसगोडी देई मातें ॥ २ ॥
चंद्र चकोराचा पुरवी सोहळा । काय त्याच्या कळा न्यून होती ॥३॥
नामा म्हणे मज अनाथा सांभाळीं । हृदयकमळीं स्थिर राहें ॥ ४ ॥

१०

ममता तुटेना मज केशिराजा । आंगीं भाव दुजा लागे पाठीं ॥ १ ॥
शरीरीं तितिक्षा नाहीं क्षमा शांती । यालागीं श्रीपती वायां गेलों ॥२॥
नामा म्हणे देवा तारिसी पतिता । म्हणोनियां सत्ता केली आम्हीं ॥३॥

११

हरिरे वाढवेळ झाला । कोण्या भक्तानें गोविला ॥ १ ॥
झडकरि येई गा विठ्ठला । कंठ आळवितां शोषला ॥ २ ॥

प्राण केव्हां येइल माझा । आलिंगीन चहूं भुजा ॥ ३ ॥
नामा गहिवरें दाटला । पूर धरणीये लोटला ॥ ४ ॥

१२

सर्वकाळ परमात्मा आहे सर्व देशीं । भावना हे अहर्निशीं दृढ धरी१
संतसमुदाय मिळति जेथें जेथें । जाय तेथें तेथें लोटांगणीं ॥ २ ॥
चिंता न करिसी नाम्या येणें तरसी जाण।तुज सांगितली खूण निर्वाणींची

अभंग जनाबाईचे.

१

ज्याचा सखा हरी । त्यावरी विश्व कृपा करी ॥ १ ॥
उणें पडों नेदी त्याचें । वारें सोसी आघाताचें ॥ २ ॥
तयावीण क्षणभरी । कदा आपण नव्हे दुरी ॥ ३ ॥
आंग आपलें वोढोनी । त्याला राखे जो निर्वाणीं ॥ ४ ॥
ऐसा अंकीत भक्तांसी । म्हणे नामयाची दासी ॥ ५ ॥

२

येग येग विठाबाई । माझे पंढरीचे आई ॥ १ ॥
भीमा आणि चंद्रभागा । तुझ्या चरणींच्या गंगा ॥ २ ॥
इतक्यांसहित त्वां बा यावें । माझ्या अंगणीं नाचावें ॥ ३ ॥
माझा रंग तुझे गुणीं । म्हणे नामयाची जनी ॥ ४ ॥

३

कां गा न येसी विठ्ठला । ऐसा कोण दोष मला ॥ १ ॥
माय बाप तूंचि धणी । मला सांभाळीं निर्वाणीं ॥ २ ॥
त्वां बा उद्धरीले थोर । तेथें कोण मी पामर ॥ ३ ॥
दीनानाथा दीनबंधु । जनी म्हणे कृपासिंधु ॥ ४ ॥

४

चिंतन चित्ताला । लावी मनाच्या मनाला ॥ १ ॥
उन्मनीच्या सुखाआंत । पांडुरंग भेटी देत ॥ २ ॥
कवटाळुनी भेटी पाठी । जनी म्हणे सांगूं गोष्टी ॥ ३ ॥

५

आम्ही पातकाची राशी । आलों तुझ्या पायापाशीं ॥ १ ॥
मना येइल तें तूं करीं । आतां तारीं अथवा मारीं ॥ २ ॥
जनी म्हणे सृष्टीवरी । एक असती तूं बा हरी ॥ ३ ॥

अभंग मुक्ताबाईचा.

१

परब्रह्मीं चित्त निरंतर धंदा । तया नाहीं कदा गर्भवास ॥ १ ॥
उपजोनी जनीं धन्य तेचि योनी । चित्त नारायणीं मुक्तलग ॥ २ ॥
अव्यक्त पैं व्यक्ति चित्तासी अनुभव । सर्वसर्वीं देव भरला दिसे ॥ ३ ॥
ज्ञेय ज्ञाता ज्ञान उन्मनी विज्ञान । चित्त नारायण जालें त्याचें ॥ ४ ॥
आदि अंतीं हरी सर्व त्याचा झाला । परतोनी अबोला प्रपंचेंसीं ॥ ५ ॥
मुक्ताईचें चित्त निरंतर मुक्त । हरि हेंचि संचित आम्हां घरीं ॥ ६ ॥

अभंग एकनाथाचे.

१

जन्मोजन्मीं आम्हीं बहु पुण्य केलें । मग या विठ्ठलें कृपा केली ॥ १ ॥
जन्मोनी संसारीं झालों याचा दास । माझा तो विश्वास पांडुरंगीं ॥ २
भ्रमर सुवासीं मधावरी मासी । तैसें या देवासीं मन माझें ॥ ३ ॥
आणिका देवासीं नेघे माझें चित्त । गोड गातां गीत विठोबाचें ॥ ४ ॥
एकाजनार्दनीं मज तेथें न्यावें । हाडसोनी द्यावें संतांपाशीं ॥ ५ ॥

२

अणुरेणुपासूनी ब्रह्मांडीं भरला । तो म्यां देखीला विटेवरी ॥ १ ॥
स्थावरजंगम भरूनी उरला । तो म्यां देखिला पंढरीये ॥ २ ॥
वेदशास्त्रपुराणें गाती जयासाठीं । तो पुंडलिकापाठीं उभा दिसे ॥ ३ ॥
वेडावल्या श्रुती न कळे म्हणती । तो उभा श्रीपती वाळुवंटीं ॥ ४ ॥
संतांचा समागम गाती आनंदानें । तो हरि कीर्तनें नाचतसे ॥ ५ ॥
एकाजनार्दनीं सुखाचा सागरू । विठ्ठल कल्पतरू वोळला आम्हां ६

३

नामसंकीर्तन । हेंचि माझें संध्यास्नान ॥ १ ॥
तुमचे पायाचा साक्षेप । हाचि माझा कालक्षेप ॥ २ ॥
तुमचे पायाचें वंदन । हेंचि माझें अनुष्ठान ॥ ३ ॥
तुमचे पायापाशीं निद्रा । हेंचि माझी प्रेममुद्रा ॥ ४ ॥
एकाजनार्दनीं सार । ब्रह्मरूप हा संसार ॥ ५ ॥

४

अनंताचे गुण अनंत अपार । न कळेचि पार श्रुतिशास्त्रा ॥ १ ॥
तो हा महाराज विटेवरी उभा । लावण्याचा गाभा शोभतसे ॥ २ ॥
कटीवरी कर ठेवी जगजेठी । पाहे कृपादृष्टीं भक्ताकडे ॥ ३ ॥
पुंडलीकाचे तेजें जोडलासे ठेवा । एकाजनार्दनीं सेवा देई देवा ॥४॥

५

काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल । नांदतो केवळ पांडुरंग ॥ १ ॥
भावभक्ति भीमाउदक तें वाहे । बरवा शोभताहे पांडुरंग ॥ २ ॥
दयाक्षमाशांति हेचि वाळुवंट । मिळालासे थाट वैष्णवांचा ॥ ३ ॥
ज्ञान ध्यान पूजा विवेक आनंद । हाचि वेणुनाद शोभतसे ॥ ४ ॥
दश इंद्रियांचा एक मेळा केला । ऐसा गोपाळकाला होत असे ॥५॥
देहीं देखिली पंढरी जनीं वनीं । एकाजनार्दनीं वारी करी ॥ ६ ॥

६

देवा माझें मन लागो तुझे चरणीं । संसारव्यसनीं पडों नेदीं ॥ १ ॥
नामस्मरण घडो संतसमागम । वाउगाचि भ्रम नको देवा ॥ २ ॥
पायीं तीर्थयात्रा मुखीं रामनाम । हाचि माझा नेम सिद्धी नेई ॥३॥
आणिक मागणें नाहीं नाहीं देवा । एकाजनार्दनीं सेवा दृढ देई ॥४॥

७

भाव तोचि देव भाव तोचि देव । ये अर्थी संदेह धरूं नका ॥ १ ॥
भावें भक्ति फळे भावें देव मिळे । निजभावें सोहळे स्वानंदाचे ॥२॥

भावचि कारण भावचि कारण । यापरतें साधन नाहीं नाहीं ॥ ३ ॥
एकाजनार्दनीं भावाच्या आवडी । मनोरथ कोडी पुरती तेणें ॥४॥

८

येथुनि पाहे तेथवरी । तंव तंव अवघा दिसे हरी ॥ १ ॥
आतां जाउनि कोठें पाहूं । जेथें पाहूं तेथें देवू ॥ २ ॥
गिरिकपाटीं कंदरीं । जिकडे पाहे तिकडे हरी ॥ ३ ॥
एका बैसला निरंजनीं । जनार्दन जनीं वनीं ॥

९

भक्तिप्रेमाविण ज्ञान नको देवा । अभिमान नित्य नवा तयामाजी १
प्रेमसुख देईं प्रेमसुख देईं । प्रेमेंविण नाहीं समाधान ॥ २ ॥
रांडवेनें जेविं शृंगारू केला । प्रेमेंविण झाला ज्ञानी तैसा ॥ ३ ॥
एकाजनार्दनीं प्रेम अति गोड । अनुभवी सुरवाड जाणतील ॥ ४ ॥

१०

तुजविण आम्हां कोण आहे देवा । धांव यादवराया मायबापा ॥१॥
पडिलोंसें डोहीं प्रपंचआवर्ती । कोण करी शांति तुजविण ॥ २ ॥
जन्ममरणाचा पडिलासे फेरा । सोडवीं दातारा मायबापा ॥ ३ ॥
एकाजनार्दनीं धांवे लवलाही । येवोनीयां हृदयीं ठाव देईं ॥ ४ ॥

११

सकळ देवांचा जनिता । त्रिगुण सत्ता चाळविता ॥ १ ॥
शरण जातां त्याच्या पायां । सर्व हारपली माया ॥ २ ॥
भेदाभेद निवारिले । सर्व स्वरूप कोंदलें ॥ ३ ॥
एकाजनार्दनीं शिवें । जीवपणा मुकलों जीवें ॥ ४ ॥

१२

भाव तोचि देव भाव तोचि देव । ये अर्थी संदेह धरूं नका ॥ १ ॥
भावाचि कारण भावचि कारण । यापरतें साधन नाहीं नाहीं ॥२॥
बहुतां सुकृतें नरदेह लाधला । भक्तिवीण गेला अधोगती ॥ ३ ॥

राव रंक हो कां उंच नीच याती । भक्तीवीण माती मुखीं त्याच्या ४
एकाजनार्दनीं हरि हरि म्हणतां । मुक्ति सायुज्यता पाठी लागे ॥५॥

अभंग तुकारामाचे.

१

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटावरी ठेवुनीयां ॥ १ ॥
गळां तुळसीहार कांसे पीतांबर । आवडे निरंतर हेंची रूप ॥ २ ॥
मकरकुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणी विराजीत ॥ ३ ॥
तुका म्हणे माझें हेंचि सर्वसूख । पाहिन श्रीमुख आवडीनें ॥ ४ ॥

२

शरण शरण नारायणा । मज अंगिकारीं दीना ॥ १ ॥
भावें आलों लोटांगणीं । रुळे तुमचे चरणीं ॥ २ ॥
सांडियेली काया । वरी ओवाळुनी पायां ॥ ३ ॥
तुका म्हणे शीर । ठेविलें पायांवर ॥ ४ ॥

३

कन्या सासुऱ्यासी जाये । मागें परतोनी पाहे ॥ १ ॥
तैसें जालें माझ्या जीवा । कधीं भेटसी केशवा ॥ २ ॥
चुकलिया माये । बाळ हुरुहुरू पाहे ॥ ३ ॥
जीवनावेगळी मासोळी । तुका तैसी तळमळी ॥ ४ ॥

४

शास्त्रांचें जें सार वेदांची जो मूर्ती । तो माझा सांगाती प्राणसखा १
म्हणउनी नाहीं आणिकांचा पांग । सर्व झालें सांग नामें एका ॥२॥
सगुण निर्गुण जयाचीं हीं अंगें । तोचि आम्हांसंगें क्रीडा करी ॥३॥
तुका म्हणे आम्ही विधीचे जनिते । स्वयंभू आईते केले नव्हों ॥४॥

५

नलगे हें मज तुझें ब्रह्मज्ञान । गोजिरें सगुण रूप पुरे ॥ १ ॥
लागला उशीर पतितपावना । विसरोनि वचना गेलासी या ॥ २ ॥

जाळोनी संसार बैसलों अंगणीं । तुझे नाहीं मनीं मानसीं ही ॥३॥
तुका म्हणे नको रागेजों विठ्ठला । उठीं देई मला भेटी आतां ॥४॥

६

देखोनीयां तुझ्या रूपाचा आकार । उभा कटीं कर ठेवूनीयां ॥ १ ॥
तेणें माझ्या चित्ता होतें समाधान । वाटतें चरण न सोडावे ॥ २ ॥
मुखें गातों गीत, वाजवीतों टाळी । नाचतों राउळीं प्रेमसुखें ॥ ३॥
तुका म्हणे मज तुझ्या नामापुढें । तुच्छ हें बापुडें सकळही ॥ ४ ॥

७

न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करो १
ऐसी माझी वाचा मज उपदेशी । आणीक लोकांसीं हेंची सांगे ॥२॥
विटंबो शरीर होत कां विपत्ती । परी राहो चित्तीं नारायग ॥ ३ ॥
तुका म्हणे नासीवंत हें सकळ । आठवे गोपाळ तेंची हित ॥ ४ ॥

८

तुजविण वाणी आणिकांची थोरी ।
तरी माझी हरी जिव्हा झडो ॥ १ ॥
तुजवीण चित्ता आवडे आणीक ।
तरी हा मस्तक भंगो माझा ॥ २ ॥
नेत्रीं आणिकांसी पाहीन आवडी ।
जातु तेचि घडी चांडाळ हे ॥ ३ ॥
कथामृतपान न करिती श्रवण ।
काय प्रयोजन मग त्यांचें ॥ ४ ॥
तुका म्हणे काय वांचून कारण ।
तुज एक क्षण विसंवतां ॥ ५ ॥

९

याजसाठीं वनांतरा । जातों सांडूनीया घरा ॥ १ ॥
माझें दिठावेल प्रेम । बुद्धी होईल निष्काम ॥ २ ॥

अद्वैताची वाणी । नाहीं ऐकत मी कानीं ॥ ३ ॥
तुका म्हणे अहंब्रह्म । आड येऊं नेदी भ्रम ॥ ४ ॥

१०

घेईं घेईं माझे वाचे । गोड नाम विठोबाचें ॥ १ ॥
डोळे तुम्ही घ्या रे सुख । पहा विठोबाचें मुख ॥ २ ॥
तुम्ही आईका रे कान । माझ्या विठोबाचे गुण ॥ ३ ॥
मना तेथें धांव घेईं । राहीं विठोबाचे पायीं ॥ ४ ॥
तुका म्हणे माझ्या जीवा । नको सोडूं या केशवा ॥ ५ ॥

११

पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण । आम्हां नारायण तैशापरी ॥ १ ॥
सर्व भावें लोभ्या आवडे हें धन । आम्हां नारायण तैशापरी ॥ २॥
तुका म्हणे एकविध झालें मन । विठ्ठलावांचून नेणे दुजें ॥ ३ ॥

१२

पापाची वासना नको दावूं डोळां । त्याहुनी आंधळा बराच मी ॥१॥
निंदेचें श्रवण नको माझे कानीं । बधिर करोनी ठेवीं देवा ॥ २ ॥
अपवित्र वाणी नको माझ्या मुखा । त्याजहुनी मुका बराच मी ॥३॥
नको मज कधीं परस्त्रीसंगती । जनांतुनी माती उठतां भली ॥ ४ ॥
तुका म्हणे मज अवघ्यांचा कंटाळा । तूं एक गोपाळा आवडसी ॥५॥

१३

विठ्ठल आमुचें जीवन । आगमनिगमांचें स्थान ।
विठ्ठल सिद्धीचें साधन । विठ्ठल ध्यान विसावा ॥ १ ॥
विठ्ठल कुळीचें दैवत । विठ्ठल वित्त गोत चित्त ।
विठ्ठल पुण्यपुरुषार्थ । आवडे मात विठ्ठलाची ॥ २ ॥
विठ्ठल विस्तारला जनीं । सप्तहि पाताळें भरूनी ।
विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं । विठ्ठल मुनिमानसीं ॥ ३ ॥

विठ्ठल जीवाचा जिव्हाळा । विठ्ठल कृपेचा कोंवळा ।
विठ्ठल प्रेमाचा पूतळा । लावियेले चाळा विश्व विठ्ठलें ॥ ४ ॥
विठ्ठल बाप माय चुलता । विठ्ठल भगिनी आणि भ्राता ।
विठ्ठलेंवीण चाड नाहीं गोता । तुका म्हणे आतां नाहीं दूसरें ५

१४

बैसोनी निवांत शुद्ध करीं चित्त । तयासुखा अंत पार नाहीं ॥ १ ॥
येऊनी अंतरीं राहील गोपाळ । सायासाचें फळ बैसलीया ॥ २ ॥
राम कृष्ण हरी मुकुंद मुरारी । मंत्र हा उच्चारीं वेळोवेळां ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें देईन मी दिव्य । जरी होइल भाव एकविध ॥ ४ ॥

१५

मी अवगुणी अन्यायी किती म्हणोनि सांगों काई ॥
आतां मज पाई ठाव देई विठ्ठले ॥ १ ॥
पुरे पुरे हा संसार कर्म बळिवंत दुस्तर ।
राहों नेदी स्थीर एके ठायीं निश्चळ ॥ २ ॥
अनेक बुद्धीचे तरंग क्षणक्षणा पालटती रंग ।
धरूं जातां संग तंव तो होतो बाधक ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां अवघी तोड माझी चिंता ।
येउनि पंढरीनाथा वास करीं हृदयीं ॥ ४ ॥

१६

आगी लागो तया सुखा । जेणें हरी नये मुखा ॥ १ ॥
मज होत कां विपत्ती । पांडुरंग राहो चित्तीं ॥ २ ॥
जळो तें समूळ । धन संपत्ति उत्तम कूळ ॥ ३ ॥
तुका म्हणे देवा । जेणें घडे तुझी सेवा ॥ ४ ॥

१७

कां रे नाठवीसी कृपाळु देवासी । पोसितो जगासी एकलाची ॥ १ ॥
बाळा दुग्ध कोणी केलेंसे उत्पत्ती । वाढवी श्रीपती सवें दोन्ही ॥२॥

फुटती तरुवर उष्णकाळमासीं । जीवन तयांसी कोण घाली ॥ ३ ॥
तेणें तुझी काय नाहीं केली चिंता । राहे त्या अनंता आठवूनी ॥ ४ ।
तुका म्हणे ज्याचें नांव विश्वंभर । करा निरंतर ध्यान त्याचें ॥ ५।

१८

ज्याचें जया ध्यान । तेंची होय त्याचें मन ॥ १ ॥
म्हणउनि अवघे सारा । पांडुरंग दृढ धरा ॥ २ ॥
समखूण ज्याचे पाय । उभा व्यापक विटे ठाय ॥ ३ ॥
तुका म्हणे नभापरता । अनूचाही गाभा*॥ ४ ॥

१९

गोविंद गोविंद । मना लागलीया छंद ॥ १ ॥
मग गोविंद ते काया । भेद नाहीं देवा तया ॥ २ ॥
आनंदलें मन । प्रेमें पाझरती लोचन ॥ ३ ॥
तुका म्हणे आळी । जेंवी नुरेची वेगळी ॥ ४ ॥

२०

पडतां जडभारीं । दासें आठवावा हरी ॥ १ ॥
मग तो होऊं नेदी शीण । आड घाली सुदर्शन ॥ २ ॥
नामाच्या चिंतनें । वारा वाटा पळती विघ्नें ॥ ३ ॥
तुका म्हणे प्राण । करा देवासी अर्पण ॥ ४ ॥

२१

रूपीं जडले लोचन । पायीं स्थिरावलें मन ॥ १ ॥
देहभाव हरपला । तुज पाहतां विठ्ठला ॥ २ ॥
कळों नये सुखदु:ख । तान हारपली भूक ॥ ३ ॥
तुका म्हणे नव्हे परती । तुझ्या दर्शनें मागुती ॥ ४ ॥

२२

मायबापें केवळ काशी । तेणें नवजावे तीर्थासी ॥ १ ॥
पुंडलीकें काय केलें । परब्रह्म उभें ठेलें ॥ २ ॥

---

* ' तुका म्हणे व्यापक नभा । होई अणूचाही गाभा '.

तैसा होई सावधान । हृदयीं धरीं नारायण ॥ ३ ॥
तुका म्हणे मायबापें । अवघीं देवाचीं स्वरूपें ॥ ४ ॥

२३

बोलणेंचि नाहीं । आतां देवाविणें कांहीं ॥ १ ॥
एकसरें केला नेम । देवा दिले क्रोध काम ॥ २ ॥
पाहेन ते पाय । जोंवरी हे दृष्टी धाय ॥ ३ ॥
तुका म्हणे मनें । हेचि संकल्प वाहणें ॥ ४ ॥

२४

तीर्थांचें जें मूळ व्रतांचें जें फळ । ब्रह्म तें केवळ पंढरीये ॥ १ ॥
तें आम्हीं देखिलें आपुल्या नयनीं । फिटलीं पारणीं डोळियांचीं २
जीवांचें जीवन सुखाचें शेजार । उभें कटीं कर ठेवूनीयां ॥ ३ ॥
सुरवरां चिंतनीं मुनिवरां ध्यानीं । आकार निर्गुणीं तेंचि असे ॥५॥
तुका म्हणे नाहीं श्रुती आतुडलें । आम्हां सांपडलें गीतीं गातां ॥६॥

२५

ऐका पंडितजन । तुमचे वंदितों चरण ॥ १ ॥
नका करूं नरस्तुती । माझी परिसा हे विनंती ॥ २ ॥
अन्न आच्छादन । हें तों प्रारब्धाआधीन ॥ ३ ॥
तुका म्हणे वाणी । सुखें वेंचा नारायणीं ॥ ४ ॥

२६

वर्णावी ते थोरी एका विठ्ठलाची । कीर्ती मानवाची बोलों नये ॥१॥
उदंडचि झाले जन्मोनीयां मेले । होवोनीयां गेले राव रंक ॥ २ ॥
त्यांचें नाम कोणी न घे चराचरीं । साही वेद चारी वर्णिताती ॥ ३॥
अक्षय अढळ चळेना वळेना । तया नारायणा ध्यात जावें ॥ ४ ॥
तुका म्हणे तुम्ही विठ्ठल चित्तीं ध्यातां। जन्ममरणव्यथा दूर होती।५॥

२७

तूं माझी माउली तूं माझी साउली । पाहतों वाटुली पांडुरंगे ॥ १ ।
तूं मज एकुला वडील धाकुला । तूं मज आपुला सोयरा जीव ॥ २ ॥
तुका म्हणे जीव तुजपाशीं आस । तुजविण ओस दाही दिशा ॥३॥

२८

एक धरिला चित्तीं । आम्हीं रखुमाईचा पती ॥ १ ॥
तेणें जालें अवघें काम । निवारिला भवभ्रम ॥ २ ॥
परद्रव्य परनारी । जाली विषाचिये परी ॥ ३ ॥
तुका म्हणे फार । नाहीं लागला व्यवहार ॥ ४ ॥

२९

माझे मज कळों येती अवगुण । काय करूं मन अनावर ॥ १ ॥
आतां आड उभा राहें नारायणा । दयासिंधुपणा साच करीं ॥ २ ॥
वाचा वदे परी करणें कठीण । इंद्रियांआधीन झालों देवा ॥ ३ ॥
तुका म्हणे तुझा जैसा तैसा दास । न धरीं उदास मायबापा ॥ ४ ॥

३०

पावलें पावलें तुझें आम्हां सर्व । दुजा नको भाव होऊं देऊं ॥ १ ॥
जेथें तेथें देखें तुझींच पाउलें । त्रिभुवन संचलें विठ्ठला गा ॥ २ ॥
भेदाभेदमतें भ्रमाचे संवाद । आम्हां नको वाद त्यांसीं देऊं ॥ ३ ॥
तुका म्हणे अणु तुजवीण नाहीं । नभाहुनी पाहीं वाड आहे ॥ ४ ॥

३१

निर्वाहापुरतें अन्नआच्छादन । आश्रमासी स्थान कोपी गुहा ॥ १ ॥
कोठेंही चित्तासी नसावें बंधन । हृदयीं नारायण सांठवावा ॥ २ ॥
नये बोलों फार बैसों जनांमध्यें । सावधानबुद्धी इंद्रियें दमी ॥ ३ ॥
तुका म्हणे घडी घडीनें साधावी । त्रिगुणाची गोवी उगवूनी ॥ ४ ॥

अभंग रामदासाचे.

१

राम आकाशीं पाताळीं । राम नांदे भूमंडळीं ।
राम योगियांचे मेळीं । सर्वकाळीं तिष्ठत ॥ १ ॥
राम नित्य निरंतरीं । राम सबाह्य अंतरीं ।
राम विवेकाचे घरीं । भक्तीवरी सांपडे ॥ २ ॥
राम भावें ठायीं पडे । राम भक्तीशीं आतुडे ।
राम ऐक्यरूपीं जोडे । मौन पडे श्रुतीशीं ॥ ३ ॥

राम योग्याचें मंडण । राम भक्ताचें भूषण ।
राम आनंदाचा घन । करी रक्षण दासाचें ॥ ४ ॥

२

राम गावा राम ध्यावा । राम जीवींचा विसावा ॥ १ ॥
कल्याणाचें जें कल्याण । रघुरायाचें गुणगान ॥ २ ॥
मंगळाचें जें मंगळ । राम कौसल्येचा बाळ ॥ ३ ॥
राम कैवल्याचा दानी । रामदासा अभिमानी ॥ ४ ॥

३

दासाची संपत्ती राम सीतापती । जीवाचा सांगाती राम एक ॥१॥
राम एक माता राम एक पिता । राम एक भ्राता सहोदर ॥ २ ॥
सहोदर विद्या वैभव कांचन । सर्व हा स्वजन राम एक ॥ ३ ॥
राम एक स्वामी राम हा कैवारी । लाभ या संसारीं राम एक ॥४॥
राम एक ज्ञान राम एक ध्यान । राम समाधान रामदासीं ॥ ५ ॥

४

राम कृपाकर विठ्ठल साकार । दोघे निराकार एकरूपें ॥ १ ॥
आमुचिये घरीं वस्ती निरंतरीं । हृदयीं एकाकार राहियेलें ॥ २ ॥
रामदास म्हणे धरा भक्तिभाव । कृपाळू राघव पांडुरंग ॥ ३ ॥

५

अपराधी अपराधी । आम्हां नाहीं दृढबुद्धी ॥ १ ॥
माझे अन्याय अगणित । कोण करील गणित ॥ २ ॥
मज सर्वस्वें पाळावें । प्रतीतीनें सांभाळावें ॥ ३ ॥
माझी वाईट करणी । रामदास लोटांगणीं ॥ ४ ॥

६

शिरीं आहे रामराज । औषधाचें कोण काज ॥ १ ॥
जो जो प्रयत्न रामावीण । तो तो दुःखासी कारण ॥ २ ॥
शंकराचें हळाहळ । जेणें केलें सुशीतळ ॥ ३ ॥
आम्हां तोचि तो रक्षिता । रामदासीं नाहीं चिंता ॥ ४ ॥

७

सोडीं संसाराची आस । धरीं भक्तीचा हव्यास ॥ १ ॥
दु:खमूळ हा संसार । तयामध्यें भक्ति सार ॥ २ ॥
ग्रंथ पाहतां लक्ष कोटी । जेथें तेथें भक्ती मोठी ॥ ३ ॥
जन्मा आलियाचें फळ । दास म्हणे तें केवळ ॥ ४ ॥

८

बाळक जाणेना मातेसी । तिचें मन तयापासीं ॥ १ ॥
तैसा देव हा दयाळ । करी भक्तांचा सांभाळ ॥ २ ॥
धेनु वत्साचेनी लागे । धांवे त्याच्या मागें मागें ॥ ३ ॥
पक्षी घेतसे गगन । पिल्यांपासीं त्याचें मन ॥ ४ ॥
मत्स्य आठवितां पाळी । कूर्म दृष्टीनें सांभाळी ॥ ५ ॥
रामी रामदास म्हणे । मायाजाळाचीं लक्षणें ॥ ६ ॥

९

हरिभक्ति करी धन्य तो संसारीं । जयाचा कैवारी देवराणा ॥ १ ॥
देवराणा सदा सर्वदा मस्तकीं । तयासी या लोकीं चाड नाहीं ॥ २ ॥
चाड नाहीं जनीं राघवाचा दास । सार्थक वयस रामदासीं ॥ ३ ॥

१०

देव जवळी अंतरीं । भेटि नाहीं जन्मवरी ॥ १ ॥
मूर्ति त्रैलोक्यीं संचली ॥ दृष्टि विश्वाची चूकली ॥ २ ॥
भाग्यें आले संतजन । झालें देवाचें दर्शन ॥ ३ ॥
रामदासीं योग झाला । देहीं देव प्रगटला ॥ ४ ॥

धांवा.

धांव रे रामराया ॥ किती अंत पाहासी । धां० रा० ॥ ध्रु० ॥
प्राणांत मांडिलासे न ये करुणा कैसी ॥
पाहीन धणिभरी चरण झाडीन केशीं ॥
नयन शिणले बा आतां केधवां येशी ॥ धांव रे० ॥ १ ॥

मीपण अहंकारें अंगीं भरलासे तांठा ॥
विषयकर्दमांत लाज नाहीं लोळतां ॥
चिळस उपजली ऐसें झालें बा आतां ॥ धांव रे० ॥ २ ॥

मारुतिस्कंधभागीं शीघ्र बैसोनि यावें ॥
राघवें वैद्यराजें कृपाऔषध द्यावें ॥
दयेचे पद्महस्त माझे शिरीं ठेवावे ॥ धांव रे० ॥ ३ ॥

या भवीं रामदास थोर पावतो व्यथा ॥
कौतुक पाहतोसी काय जानकीच्या कांता ॥
दयाळा दीनबंधो भक्तवत्सला ताता ॥ धांव रे० ॥ ४ ॥

पदें.

१

तें मन निष्ठुर कां केलें । जें पूर्ण दयेनें भरलें ॥ ध्रु० ॥
गजेंद्राचे हाकेसरिसें । धांउनियां आलें ॥ १ ॥
प्रल्हादाच्या भावार्थासी । स्तंभीं गुरगुरलें ॥ २ ॥
पांचाळीच्या करुणावचनें । कळवळुनी आलें ॥ ३ ॥
एकाजनार्दनपूर्णकृपेनें । निशिदिनिं पदिं रमलें ॥ ४ ॥

२

सगुणचरित्रें परम पवित्रें हरिचीं वर्णावीं ।
सज्जनवृंदें मनोभावानें आधीं वंदावीं ॥ ध्रु० ॥
संतसंगें अंतररंगें नाम बोलावें ।
कीर्तनरंगीं देवासंनिध सुखेंचि डोलावें ॥ १ ॥
भक्तिज्ञानाविरहित गोष्टी इतरा न कराव्या ।
प्रेमभरें बा ! वैराग्याच्या युक्ती विवराव्या ॥ २ ॥
जेणेंकरुनीं मूर्ति ठसावे अंतरिं श्रीहरिची ।
ऐसी कीर्तनमर्यादा ही देवाचे घरची ॥ ३ ॥

अद्वयभजनें अखंडस्मरणें वाजवि करताळी ।
एकाजनार्दनीं मुक्ति होय तात्काळीं ॥ ४ ॥

३

स्मरतां नित्य हरी । मग ती माया काय करी ॥ ध्रु० ॥
श्रवणें मननें अद्वयवचनें । पळतो काळ दुरी ॥ मग ती० ॥ १ ॥
करुणाकर वरदायक हरि जो । ठेवित हात शिरीं ॥ २ ॥
तोचि निरंतर उद्धवचरणीं । अमृतपान करी ॥ ३ ॥

४

हरि मज कसा करिल भवपार ॥ ध्रु० ॥
तन मन धन विषयावरि वळतें । भजनीं आळस फार ॥ १ ॥
स्वात्मबुद्धि विचारुनि पाहीं । कोणि न केला उपकार ॥ २ ॥
अमृत म्हणे तुम्हि भजा निरंतर । श्रीधरगुरुचे पाय ॥ ३ ॥

५

चिंता प्राण्यांची हरिला ॥ ध्रु० ॥
पक्ष्यां पदरीं संचय कैंचा । चारा पुरवि तयांला ॥ १ ॥
कीडमुंगी कांहीं मागत नाहीं । साखर देइ तयांला ॥ २ ॥
अमृत म्हणे हरिघरिं काय उणें । जो जें मागे देइ तयाला ॥ ३ ॥

६

कां रे नाठविसी कमलनयन वासुदेव ॥ ध्रु० ॥
जपति जया संत सनक । सकळजनां जननिजनक ॥ कां रे ॥ १ ॥
कलुषहरण विमलचरित । करुनि निजानंदभरित ॥ कां रे ॥ २ ॥
विचरे आनंदतनय । हृदयिं धरुनि नंदतनय ॥ कां रे ॥ ३ ॥

७

धांव विभो करुणाकर माधव देव दयानिधे देवकिनंदन ॥ ध्रु० ॥
हे करुणाकर दीनजनोद्धर हा भव दुस्तर यांतुनि उद्धर ॥ १ ॥
काममदादिक गांजिति हे अति धांव रमापति सेवकहितकर ॥ २ ॥
जननमरणभयहरण करिं त्वरें चरणिं शरण तव केशवकिंकर ॥ ३ ॥

८

अवघा तूंचि हरी तूंचि हरी । तूं जीवन मी लहरी ॥ ध्रु० ॥
जननी जनक तूं बंधू । सखा जिवलगा करुणासिंधु ॥ १ ॥
सद्विद्या निजधन तूं । देऊनि तोडिसि भवबंधन तूं ॥ २ ॥
निजरंगा तूं पाहीं । अवघा तूंचि तूं मी नाहीं ॥ ३ ॥

९

तूं माझा यजमान । रामा ॥ ध्रु० ॥
जननीजठरीं रक्षियलें मज । पोसुनि पंचहि प्राण ॥ रामा० ॥१॥
बाहेर निघतां मातेचे स्तनीं । पय केलें निर्माण ॥ रामा० ॥ २ ॥
ऐसें असतां या पोटाची । कां करुं चिंता जाण ॥ रामा० ॥ ३ ॥
मध्वमुनीश्वर स्वामि रमापति । धारि माझा अभिमान ॥ रा०॥४॥

१०

केला राम धणी राम धणी । अगणित ज्याची करणी ॥ ध्रु० ॥
रामीं रतली वाणी । आतां सुखासि नाहीं हाणी ॥ केला० ॥ १ ॥
रामावांचुनि कांहीं । आणिक साधन उरलें नाहीं ॥ केला०॥ २ ॥
कोकिळप्रभुसी ध्यातां। सहजाचि निजपद आलें हातां ॥ केला० ३

११

पतितपावन नाम ऐकुनी आलों मी द्वारा ।
पतितपावन न होसि म्हणुनी जातों माघारा ॥ ध्रु० ॥
सोडीं देवा! ब्रीद आतां न होसि अभिमानी ।
पतितपावन नाम तुजला ठेवियलें कोणीं ॥ १ ॥
घेसी तेव्हां देसी ऐसा असती उदार ।
काय देवा! रोधूं तुमचें कृपणाचें दार ॥ २ ॥
उच्छिष्टाचें शीत देवा न टाकिसी बाहेरी ।
कोणीं दिधली भगवंत तुजला भूषणाची थोरी ॥ ३ ॥
नामा म्हणे बा तुमचें नलगे मज कांहीं ।
प्रेम असों द्या हृदयीं तुमचे आठवीन पाई ॥ ४ ॥

१२

भक्तीं आकळिला । दयाघन भक्तीं आकळिला ॥ ध्रु० ॥
पार्थरथीं सारथ्य करी जो । निजपद दे बळिला ॥ १ ॥
प्रल्हादास्तव प्रकटुनि स्तंभीं । दानव निर्दळिला ॥ २ ॥
रुक्मिणिनें एक्या तुळसिदळानें । गिरिधरप्रभु तुळिला ॥३॥

१३

*आम्ही काय कुणाचें खातों रे । तो राम आम्हांला देतो रे ॥ ध्रु० ॥
बांधिले बुरुज किल्ल्याचे तट । त्याला फुटती पिंपळवट ।
तेथें कोण लावितो मोट । बुडाला पाणि घालितो ? ॥ १ ॥
खडक फोडितां सजिव रोडकी । सर्वांनिं पाहिली बेडकी ।
सिंधु नसतां तियेचे मुखीं । पाणी ( कोण ) घालितो ? ॥ २ ॥
पहा पहा मातेचीये स्तनीं । चिंतितां रक्तमांसमलघाणी ।
तयास्थळिं विमल दुग्ध घालोनी । कोण पोसीतो ? ॥ ३ ॥
पहा पहा रे पाण्याचे बुडबुडे । गगन सदा सर्वदा कोरडें ।
दास म्हणे जीवन चहूंकडे । पाडुनि सडे कोण उगवितो ? ॥ ४ ॥

१४

नमो भक्तजनवत्सला पांडुरंगा । निजपदांबुजभजकभीतिभंगा ॥ध्रु.॥
तूंचि जननी जनक तूंचि माझा सखा । स्वजन तूंचि सुहृद्गुरु गोत्रबंधू ।
तूंचि माझें द्रविणधाम गतिविश्राम । तूंचि सकळकाम दीनबंधू ॥ १ ॥
त्रिविधतापत्रयें बहुत मी तापलों । विविध या भवभया फार भ्यालों ।
अमृतदृष्टी करुनि वृष्टि मजवर करीं । सर्वभावें तुला शरण आलों ॥ २ ॥
त्वत्कथाश्रवण तवनामसंकीर्तन- । स्मरणपदसेवनार्चनवंदना- ।
दास्यसख्यात्मनिवेदना नवविधा- । माजि एक तरि देईं भजना ॥ ३ ॥

* हें सुंदर पद, मी समर्थांच्या मठांतले त्यांचे शिष्य पोसतों म्हणून शिवरायाला अहंकार झाला होता तो घालविण्याकरितां समर्थांनीं त्यास रानांत नेऊन ' खडक फोडून सजिव बेडकी ' दाखविली, तेव्हां रचिलें आहे

विधिहरप्रमुख सुरयोगियां नातुडसी । श्रुतिशतें ज्याचिया गाति विरुदा
तो अम्हां सुलभ सन्मूख दृष्टीपुढें । दिससि प्रत्यक्ष प्रल्हादवरदा ॥४॥

१५

*देवा न लगे तुमचें कांहीं हो ॥ चंचळ हें मन निश्चळ होउनि ॥
विनटो तुमचे पायीं हो ॥ ध्रु० ॥
न लगे गृहधन सुतदारा मज इंद्रपदादि कदाही हो ।
तव पदपंकजभजनेंविण मज सर्वेहि ते अपदाही हो ॥ १ ॥
देशी वर जरि तरि तूं आतां याचि स्वरूपें राहीं हो ।
यावच्चंद्रदिवाकर येथुनि कोठेंही नव जाई हो ॥ २ ॥
दर्शनमात्रें जड मुढ पापी निजपदवी त्यां देई हो ।
शिवतनय तव दीन तयाचे हृदयमंदिरा येई हो ॥ ३ ॥

१६

धांव पाव सांवळे विठाबाई ! कां मनीं धरिली अढी ।
अनाथ मी अपराधी स्मरतों उतरा पैलथडी ॥ विठोबा कां मनिं० ॥ध्रु.॥
एकनाथाघरिं पाणि वाहिलें गंगेच्या कावडी ।
कबिराचे ते शेले विणुनी त्यांची घालिसि घडी ॥ कां हो धरिली०॥१॥
सांवतामाळ्याची भाजी खुडुनी त्याची बांधिसी जुडी ।
नरसिमेहेत्याची हुंडि पटवुनी त्याचा झालासी गडी ॥ कां हो० ॥२॥
जनाबाइचीं धुणीं धुतलीं चंद्रभागेच्या थडी ।
सजनकसाई मांस विकीतो त्याची लाविसी धडी ॥ कां० ॥ ३ ॥
दामाजीपंताचे वेळीं झाला माहार तांतडी ।
पायीं वाहणा हातीं काठी खांद्यावर घोंगडी ॥ कां० ॥ ४ ॥
चोख्यामेळ्याचे घरीं येउनी ओढिसि ढोरें तांतडी ।
त्याची स्त्री बहु हाका मारी कोठें दिधली दडी ॥ ५ ॥
गजेंद्राचा धांवा ऐकुनी वेगें घालिसी उडी ।
अर्जुनरथिं सारथ्य करूनी फेडि त्याचि सांकडी ॥ ६ ॥

* १४ व १५ हीं दोन्हीं पदें प्रल्हादबोवा बडवे यांचीं आहेत.

# ३ नामसंकीर्तन.

रामकृष्णमंत्र जनांसी उद्धार ।
आणिक साचार मार्ग नाहीं ॥ १ ॥

—निवृत्तिनाथ.

चहूं वर्णांस नामाधिकार । नामीं नाहीं लहानथोर ।
जड मूढ पैलपार । पावती नामें ॥ १ ॥

—रामदास.

कल्याणानां निधानं कलिमलमथनं पावनं पावनानां
पाथेयं यन्मुमुक्षोः सपदि परपदप्राप्तये प्रस्थितस्य ।
विश्रामस्थानमेकं कविवरवचसां जीवनं सज्जनानां
बीजं धर्मद्रुमस्य प्रभवतु भवतां भूतये रामनाम ॥ १ ॥
हे जिव्हे ! रससारज्ञे सर्वदा मधुरप्रिये
नारायणाख्यपीयूषं वद जिव्हे निरंतरम् ॥ २ ॥
जिव्हे कीर्तय केशवं मुररिपुं चेतो भज श्रीधरं
पाणिद्वंद्व समर्चयाच्युतकथां श्रोत्रद्वयं त्वं शृणु ।
कृष्णं लोकय लोचनद्वय हरेर्गच्छांघ्रियुग्मालयं
जिघ्र घ्राण मुकुंदपादतुलसीं मूर्धन्नमाधोक्षजम् ॥ ३ ॥

१

नाम मुखीं सदा तोचि पै भाग्याचा । तयासी यमाचा धाक नाहीं॥१॥
रामनाम हरी सर्वकाळ वसे । तेथेंचि निवासें वसे हरी ॥ २ ॥
हरिध्यान वसे अखंड पै सर्वदा । न पवे तो आपदा इये जनीं ॥ ३ ॥
निवृत्ति समता हरिभजन करी । सर्वत्र कामारी रिद्धिसिद्धी ॥ ४ ॥

२

नित्य हरिकथा नित्य नामावळी । वैष्णवांचें कुळीं धन्य जन्म ॥१॥
म्हणोनी पंढरी उपजावे संसारीं । प्रत्यक्ष श्रीहरी तीरीं उभा ॥ २ ॥
नित्यता दिवाळी नाहीं तेथें द्वैत । नित्यता अद्वैत तिष्ठतसे ॥ ३ ॥
निवृत्ति सादर विष्णुमय सार । विठ्ठल आचार पंढरीये ॥ ४ ॥

३

मनाचे मवाळ हरिरूप चिंतिती । रामकृष्ण मूर्ती नित्यकथा ॥ १ ॥
रामकृष्णध्यान सदा पै सर्वदा । न पवेल आपदा नानायोनी ॥ २ ॥
हरिध्यान जप मुक्त पैं अनंत । जीवशीवीं रत सर्वकाळ ॥ ३ ॥
सोपान प्रेमाचा आनंद हरीचा । तुटला मोहाचा मोहपाश ॥ ४ ॥

४

काळवेळ नसे नामसंकीर्तनीं । उंच नीच योनी हेंही नसे ॥ १ ॥
धरा नाम कंठीं सदासर्वकाळ । मग तो गोपाळ सांभाळील ॥ २ ॥
कृपाळू कोंवसा सुखाचा सागर । करील उद्धार भाविकांसीं ॥ ३ ॥
नामा म्हणे फार सोपें हें साधन । वाचे नाम घेणें इतुकेंची ॥ ४ ॥

५

सकळ साधनाचें सार । रामकृष्ण हा उच्चार ॥ १ ॥
म्हणा गोविंद नरहरी । सकळ जीवां तोचि तारी ॥ २ ॥
नाम घेतां हरी माधव । तरताती सकळ जीव ॥ ३ ॥
नामा म्हणे केशवाचे । धन्य जीवित वैष्णवांचें ॥ ४ ॥

६

नाम फुकट चोखट । नाम घेतां नये वीट ॥ १ ॥
जडा शिळा ज्या सागरीं । आत्माराम नामें तारी ॥ २ ॥
पुत्रभावें स्मरण केलें । तया वैकुंठाशीं नेलें ॥ ३ ॥
नाममहिमा जनी जाणे । ध्यातां विठ्ठलची होणें ॥ ४ ॥

७

नामें दोष जळती । नामें पापी उद्धरती ॥ १ ॥
हें तों आलें अनुभवा । सत्यजीवा प्रत्यया ॥ २ ॥

नामें अपार तारिले । नामें जीवन्मुक्त झाले ॥ ३ ॥
कान्हुपात्रा नाम घेतां । पायीं जडली तत्वतां ॥ ४ ॥

८

नामाचिया बळें न भीऊं सर्वथा । कळिकाळाच्या माथां सोटे मारूं ॥ १ ॥
वैकुंठींचा देव आणूं या कीर्तनीं । विठ्ठल गाउनी नाचों रंगीं ॥ २ ॥
सुखाचा सोहळा करूनी दिवाळी । प्रेमें वनमाळी चित्तीं धरूं ॥ ३ ॥
सांवता म्हणे ऐसा भक्तिमार्ग धरा । तेणें भक्ति द्वारा वोळंगती ॥ ४ ॥

९

नाम वदतां हे वैखरी । चित्त धांवे विषयावरी ॥ १ ॥
कैसें होताहे स्मरण । स्मरणामाजी विस्मरण ॥ २ ॥
नामरूपा नाहीं मेळ । नुसता वाचेचा गोंधळ ॥ ३ ॥
एकाजनार्दनीं नाम । नामीं प्रगटे आत्माराम ॥ ४ ॥

१०

सदा सर्वकाळ नाम मुखीं गाये । आणिक तें नये दुजा हेत ॥ १ ॥
धन्य त्याची माय पावन तें कुळ । धन्य तो निर्मळ वंश त्याचा ॥ २ ॥
जन्मजन्मांतरींचें सुकृत पदरीं । वाचे तो उच्चारी रामकृष्ण ॥ ३ ॥
एकाजनार्दनीं सदा जपे नाम । तो देह उत्तम इहीं लोकीं ॥ ४ ॥

११

नाम मुखीं गातां विषयाची वार्ता । नोहेचि सर्वथा गातयासी ॥ १ ॥
नाम तें पावन नाम तें पावन । नामावांचुन जाण श्रेष्ठ कोण ॥ २ ॥
एकाजनार्दनीं नाम तें पावन । त्रिभुवनीं मंडन नाम सत्य ॥ ३ ॥

१२

नामधारक हो कां भलता । त्याचे चरणीं ठेविन माथा ॥ १ ॥
न म्हणे उत्तम अधम । मुखीं जपतां रामनाम ॥ २ ॥
याति कुळाचें कारण । नाहीं नाहीं नामाविण ॥ ३ ॥
नाम जपे तोचि श्रेष्ठ । एकाजनार्दनीं वरिष्ठ ॥ ४ ॥

१३

वाचे विठ्ठल बोलावें । मग पाउल टाकावें ॥ १ ॥
ऐसा ज्यांचा नेमधर्म । मुखीं विठ्ठलाचें नाम ॥ २ ॥
सर्वकाळ वाचे । विठ्ठलनांम वदती साचें ॥ ३ ॥
कुळधर्म आमुचा । म्हणे एका जनार्दनाचा ॥ ४ ॥

१४

रामनामकथा गंगा । स्मरणें पावन करी जगा ॥ १ ॥
तिशीं प्रेमपूर आला । शंकर हृदयीं सामावला ॥ २ ॥
रामदासाची माउली । आळशावरी गंगा आली ॥ ३ ॥

१५

धन्य धन्य तें नगर । जेथें कथा निरंतर ॥ १ ॥
गुण गाती भगवंताचे । तेचि मानावे दैवाचे ॥ २ ॥
स्वयें बोले जगजीवन । थोर कलियुगीं कीर्तन ॥ ३ ॥
रामदास म्हणे भले । हरिभक्तीं उद्धरले ॥ ४ ॥

१६

तुटे भवरोग । संचितक्रियमाणभोग ॥ १ ॥
ऐसें विठोबाचें नाम । उच्चारितां खंडे जन्म ॥ २ ॥
वसों न सके पाप । पळे त्रिविध तो ताप ॥ ३ ॥
तुका म्हणे माया । होय दासी लागे पायां ॥ ४ ॥

१७

हरिकथे नाहीं । विश्वास ज्याचे ठायीं ॥ १ ॥
त्याची वाणी अमंगळ । कान उंदराचें बीळ ॥ २ ॥
सांडुनी हा रस । करिती आणीक सायास ॥ ३ ॥
तुका म्हणे पिसीं । वायां गेलीं किती ऐसीं ॥ ४ ॥

१८

नाम घेतां नलगे मोल । नाम मंत्र नाहीं खोल ॥ १ ॥
दोंची अक्षरांचें काम । उच्चारावा रामराम ॥ २ ॥

'नाहीं वर्णधर्मयाती । नामीं अवघींच सरतीं ॥ ३ ॥
तुका म्हणे नाम । चैतन्यनिजधाम ॥ ४ ॥

१९

राम म्हणे ग्रासोग्रासीं । तो जेविला उपवासी ॥ १ ॥
धन्य धन्य तें शरीर । तीर्थव्रतांचें माहेर ॥ ध्रु० ॥
राम म्हणे करितां धंदा । सुखसमाधी त्या सदा ॥ २ ॥
राम म्हणे वाटचाली । यज्ञ पाउला पाउलीं ॥ ३ ॥
राम म्हणे भोगी त्यागी । कर्म न लिंपे त्या अंगीं ॥ ४ ॥
ऐसा राम जपे नित्य । तुका म्हणे जीवन्मुक्त ॥ ५ ॥

२०

नामसंकीर्तन साधन पैं सोपें । जळतील पापें जन्मांतरिंचीं ॥ १ ॥
न लगे सायास जावें वनांतरा । सुखें येतो घरा नारायण ॥ २ ॥
ठायींच बैसोनी करा एकचित्त । आवडीं अनंत आळवावा ॥ ३ ॥
रामकृष्ण हरी विठ्ठल केशवा । मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥ ४ ॥
यावीण असतां आणीक साधन । वाहातसे आण विठोबाची ॥ ५ ॥
तुका म्हणे सोपें आहे सर्वांहुनी । शाहणा तो धणी घेतो तेथें ॥ ६ ॥

२१

रामनामाचे पोवाडे । नित्य ज्याची वाचा पढे ॥ १ ॥
धन्य तो एक संसारीं । रामनाम जो उच्चारी ॥ २ ॥
रामनाम गर्जे वाचा । काळ आज्ञाधारक त्याचा ॥ ३ ॥
तुका म्हणे रामनामीं । कृतकृत्य झालों आम्ही ॥ ४ ॥

श्लोक.

अहो येतां जातां उठत बसतां कार्य करितां
सदा देतां घेतां वदनिं वदतां ग्रास गिळितां ।
घरीं दारीं शय्येवरि रतिसुखाचे अवसरीं
समस्तांची लज्जा त्यजुनि भगवच्चिंतन करीं ॥ २४ ॥

नका याग मांडूं; नका प्राण कोंडूं;
नका द्रव्य, दारा, घरें, भोग भोडूं; ।
नका कष्टुनी पर्वताग्रीं तपाला
मुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळां ॥ २५ ॥
हरिचरणसरोजीं चित्सुधासारपानें
भ्रमर परमयोगी गुंजती नामगानें ।
हरति सकळ दुःखें, हीं सुखाचीं निधानें
वद वद वद जिव्हे! रामनामें रसाळें ॥ २७ ॥
न कळतां पद अग्निवरी पडे
न करि दाह असें न कधीं घडे ।
अजितनाम वदो भलत्या मिसें
सकळ पातक भस्म करीतसे ॥ २८ ॥
न जाणतहि ये मुखा हरि तथापि पापें हरी
स्मरोनि महिमा स्मरे वदनिं तींच नामें जरी ।
प्रवृत्तिविषयीं जरी असति त्या जनांचीं मनें
विरक्त करितो हरि स्वगुणनामसंकीर्तनें ॥ २९ ॥
न कर्ण तें बीळचि युग्म वाटे । कथासुधा हे जरि त्या न वाटे ।
जिव्हा जरी कृष्णकथा न वाची । ते बेडुकाचीच न मानवाची॥३०॥
—वामनपंडित.

तेचि या कलियुगांत कृतार्थ ॥ स्तुत्य ते नर सभाग्य यथार्थ ।
रामनाम सतत स्मरणारे ॥ तेथ सादर जना करणारे ॥ ३१ ॥
कली हा दोषांचा निधि परि गुणज्ञीं निवडिला
असे येथें मोठा गुण विगुण जेणें दवडिला ।
सुखें तारी सर्वां त्वरित हरिचें कीर्तन खरें
तुटेना वज्रें तो सहज तुटतो बंध नखरें ॥ ३२ ॥
भगवन्नामोच्चारें सकळेंहि अघें सवासनें जळती ।
मळती न नामधारक, पळती यमदूत, विघ्नही टळती ॥३३॥
—मोरोपंत.

T-3154.C24

# ४ सद्गुरुस्तव.

**सद्गुरुवांचूनी सांपडेना सोय**
**धरावे ते पाय आधीं त्याचे ॥ १ ॥**

—तुकाराम.

श्रीसद्गुरुस्तोत्र.

गुरू! गुणालया! परापराधिनाथ! सुंदरा!
शिवादिकांहुनी वरिष्ठ तूंचि एक साजिरा।
गुणावतार तूं धरोनि या जगासि तारिसी
सुरां मुनीश्वरां अलभ्य त्या गतीस दाविसी ॥ १ ॥

जयां गुरुत्व बोधलें तयांसि कार्य साधिलें
भवार्णवासि लंघिलें सुविघ्नदुर्ग भंगिलें।
सहा रिपूंसि जिंकिलें निजात्मतत्त्व चिंतिलें
परात्परासि पाहिलें प्रकृष्टदुःख साहिलें ॥ २ ॥

मनोजनाश जाहला सुखात्मबोध बोधला
मनासि वेध वेधला स्वयेंचि वायु रोधला।
गिरेसि मौन बैसलें दिठीस तेज पैसलें
अनाहतध्वनीस या भरोनि कान ऐकिलें ॥ ३ ॥

उदान कंठ रोधिला अपान ऊर्ध्व चालिला
समान मध्य राहिला सुमान कुंभकीं भला।
त्यजोनि नीजपन्नगीं स्वमार्ग तो धरी उगी
प्रवाळवर्ण साजिरी म्हणोनि वर्णिती जगीं ॥ ४ ॥

षडैकचक्रभेदनी सुकुंडली निघे झणी
पिळोनि नाडिकारसांसि पुष्ट होय पीउनी ।
हृदब्ज तें विकासवी चिदंबरासि दाखवी
सहस्रपत्र पावुनी मरंद तेथ चाखवी ॥ ५ ॥
निजस्वरूपलाभ हा ययापरी घडे पहा
महंत राजयोग हा प्रभाव दाखवी महा ।
अणीक एक सांगतों गुरूपुजेसि लागतो
तयास भक्तिमार्ग तो मनांत पूर्ण जागतो ॥ ६ ॥
हरीच तोचि जाहला हरीरुपें विराजला
हरीविना दुजी परी न देखतांचि रंगला ।
त्यजोनि मानकामना मदादिदंभवासना
अहंकृती कुभावना विटाळ नावडे मना ॥ ७ ॥
सदा प्रतोष अंतरीं अखंड आठवी हरी
क्षमाप्रसाद सारिखाचि थोर लाहनावरी ।
सुसत्ववृत्ति चांगली तयासि गोड लागली
विशेष संतमंडळी मनासि मानली भली ॥ ८ ॥
जयावरी गुरूकृपा तयासि दुर्गुणीं त्रपा
न आतळे तमोरजादि भावना सरीसृपा ।
असाचि सूक्ष्मभक्तिचा निदान सर्व युक्तिचा
प्रभाव विष्णुशक्तिचा गडी प्रधानमुक्तिचा ॥ ९ ॥
गुरू उदार माउली प्रशांति सौख्यसाउली
जया नरांसि फावली तयांसि सिद्धि गावली ।
गुरू गुरू गुरू गुरू म्हणोनि जो स्मरे नरू
तरोनि मोह सागरू सुखी घडे निरंतरू ॥ १० ॥
गुरू चिदब्धिचंद्र हा महत्पदीं महेंद्र हा ।
गुरुप्रतापरुद्र हा गुरू कृपासमुद्र हा ।

गुरू स्वरूप दे स्वथा गुरूचि ब्रह्म सर्वथा
गुरुविना महान्यथा नसे जगीं निवारिता ॥ ११ ॥
शिवाहुनी गुरू असे अधीक हें मला दिसे
नरांसि मोक्ष द्यावया गुरुस्वरूप घेतसे ।
शिवें स्वरूप आपुलें न मोक्षदक्ष देखिलें
गुरुत्व पूर्ण घेतलें म्हणोनि कृत्य साधिलें ॥ १२ ॥
गुरूचि बाप माउली गुरूचि दीन साउली
गुरूचि शिष्यवासुरांसि कामधेनु गाउली ।
गुरूचि चिंतितार्थ दे गुरूचि तत्व तो वदे
अलभ्य मोक्षलाभ आपुल्या कृपें गुरूचि दे ॥ १३ ॥
गुरूचि भेद नाशितो जडांधकार शोषितो
गुरूचि मोह वारितो अविद्यभाव सारितो ।
गुरूचि ब्रह्म दावितो गुरूचि ध्यान लावितो
गुरूचि विश्व सर्व आत्मरूप हें बुझावितो ॥ १४ ॥
गुरूचि मूळदीप रे जगद्गुरुस्वरूप रे
समस्त देवही तदंश दीसताति साजिरे ।
गुरूचि पूर्ण सिंधु रे तयांत देव बिंदु रे
गुरू स्वयंभु सूर्य अन्य सर्वही मयूख रे ॥ १५ ॥
गुरूचि दिव्य दृष्टि रे गुरूचि सर्व सृष्टि रे
गुरूचि ज्ञानबोध रे गुरूचि सर्व शोध रे ।
गुणांत तोचि विस्तरे मनांत तोचि संचरे
समस्त भूतमात्र चेष्टवोनि एकला उरे ॥ १६ ॥
गुरू विराटरूप रे गुरू हिरण्यगर्भ रे
गुरूचि ओम् त्रिवर्णपंचवर्ण मुख्य तार रे ।
गुरूचि विश्व तैजसू गुरूचि प्राज्ञ पूरुषु
गुरुविना दुजा नसे श्रुतीस घोष सर्वसु ॥ १७ ॥

गुरूचि ध्येय ध्यान रे गुरूचि सर्व मान रे
नसे गुरूसमान रे जगीं गुरूस मान रे ।
गुरूचि थोर सान रे महासुखा निदान रे
गुरू गुरू गुरू गुरू करीं म्हणोनि गान रे ॥ १८ ॥

गुरुस्वरूप चिंतिजे समाधि हेचि बोलिजे
समस्त वेदपाठनाममंत्रजाप्य जाणिजे ।
यथार्थ सर्व तीर्थ सद्गुरूपदाब्जतोय हें
गुरूचि सेवणें अनेक अश्वमेधयज्ञ हें ॥ १९ ॥

नमो गुरू कृपाकरा नमो गुरू गुणाकरा
नमो गुरू परात्परा नमो गुरू महत्तरा ।
नमो गुरू सनातना नमो गुरू मनोन्मना
नमो गुरू घनाघना नमो गुरू निरंजना ॥ २० ॥

—निरंजनमाधव.

' विसरूं कसा मी गुरुपादुकांला. '

ज्याच्या कृपेनें निजलाभ झाला । देहत्रयाचा जडभार गेला ।
निरामय ऐसा मज बोध केला । विसरूं कसा मी गुरुपादुकांला ॥ १
स्वरूप माझें मज दाखवीलें । भावाअभावाविरहीत केलें ।
उपकार ज्याणें मज पूर्ण केला । विसरूं० ॥ २ ॥
स्वानंदडोहीं मन कालवीलें । हातीं धरूनी निज लेववीलें ।
हा बोध ज्याणें मज पूर्ण केला । विसरूं० ॥ ३ ॥
प्रसादकाळीं मति शुद्ध झाली । तेथें माझी दुर्बुद्धि गेली ।
संसार ज्याणें स्मशान केला । विसरूं० ॥ ४ ॥
जन्मांतरेंही बहु चूकवीलें । जिवाशिवाशीं पद मावळीलें ।
सखाचि ऱ्यां हो गुरु पूर्ण केला । विसरूं० ॥ ५ ॥
आत्माचि माझा मज दाखवीला । सोहंप्रकाशें मज भेटवीला ।
जिवशीव तेथें विरोनि गेला । विसरूं० ॥ ६ ॥

धरोनि मातें निवांत केलें । ठेवूनि पोटीं परिपार नेलें ।
सांगोनि वाक्यें उपदेश केला । विसरूं० ॥ ७ ॥
अखंड माझे हृदयीं रहावें । स्वभावदृष्टीं परिपूर्ण पहावें ।
टाकोनि मातें दुर नाहिं गेला । विसरूं० ॥ ८ ॥

आर्या.

सद्गुरुवांचुनि वांचुनि विफळ जिणें यांत वांकडें काय ।
शुक सांगे, 'भागविला कृष्णें वाहूनि लांकडें काय' ॥ १ ॥
सद्गुरुअनुग्रहाविण हरिला तो कठिण सर्वथा पटणें ।
गोरा संत परीक्षी मस्तकिं हाणूनि सर्व थापटणें ॥ २ ॥

—मोरोपंत.

पदें.

१

माझी देवपुजा देवपुजा । पाय तुझे गुरुराजा ॥ ध्रु० ॥
गुरुचरणाची माती । तेचि माझी भागीरथी ॥ माझी० ॥ १ ॥
गुरुचरणाचा बिंदु । तोचि माझा क्षीरसिंधु ॥ माझी० ॥ २ ॥
गुरुचरणाचें ध्यान । तेंचि माझें संध्यास्नान ॥ माझी० ॥ ३ ॥
शिवदिन केसरिपायीं । सद्गुरुवांचुनि दैवत नाहीं ॥ माझी०॥४॥

२

श्रीगुरुचें चरणकंज हृदयीं स्मरावें ॥ ध्रु० ॥
निगमनिखिलसाधारण सुलभाहुनि सुलभ बहु ॥
इतर योगयागविषमपंथिं कां शिरावें ॥ १ ॥
नरतनुदृढनावेसी बुडवुनि अतिमूढपणें ।
दुष्ट नष्ट कुकरसुकरतनु कां फिरावें ॥ २ ॥
रामदास विनवी तुज अझुनि तरी समज उमज ।
विषयवीष पेउनियां फुकट कां मरावें ॥ ३ ॥

## अभंग.

१

सद्गुरुनायकें पूर्ण कृपा केली । निजवस्तु दाविली माझी मज ॥ १ ॥
माझें सुख मज दावियेलें डोळां । दिधली प्रेमकळा ज्ञानमुद्रा ॥ २ ॥
तया उतराई व्हावें कवण्या गुणें । जन्मा नाहीं येणें ऐसें केलें ॥३॥
नामा म्हणे निकी दावियेली सोय । न विसरावे पाय विठोबाचे ॥४॥

२

सद्गुरूचे पाय जीवें न विसंबावे । मन वळवावें वृत्तिसहित ॥ १ ॥
डोळियांचे डोळे उघडले जेणें । आनंदाचें लेणें लेवविलें ॥ २ ॥
जन्ममरणाचें फोडिलें सांकडें । कैवल्याचि पुढें दाखवीलें ॥ ३ ॥
मोहरले तरु पुष्पफळभारें । तेचि निर्विकार सनकादिक ॥ ४ ॥
नामा म्हणे स्वामी खेचर माउली । कृपेची साउली केली मज ॥५॥

३

न सोडिं रे मना गुरु जनार्दना । संसारबंधना सोडविलें ॥ १ ॥
संसार अजगर झोंबला विखार । धन्वंतरी थोर जनार्दन ॥ २ ॥
जनार्दना ऐसी माउली परियेसीं । बहु कष्टें सायासीं जोडियेली॥३
जनार्दनें रंक तारियेला एका । संसारीं हा सखा जनार्दन ॥ ४ ॥

## श्लोक.

तस्माद्गुरुं प्रपद्येत जिज्ञासुः श्रेय उत्तमम् ।
शाब्दे परे च निष्णातं ब्रह्मण्युपसमाश्रयम् ॥ १ ॥
आचार्यं मां विजानीयान्नावमन्येत कर्हिचित् ।
न मर्त्यबुद्ध्याऽसूयेत सर्वदेवमयो गुरुः ॥ २ ॥
यावन्नानुग्रहः साक्षाज्जायते परमेश्वरात् ।
तावन्न सद्गुरुः कश्चित्सच्छास्त्रान्नोपलभ्यते ॥ ३ ॥
गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ४ ॥

# ५ संतमाहात्म्य.

**मी तों भक्तरूप भक्त माझें स्वरूप ।**
**प्रभा आणि दीप जयापरी ॥ १ ॥**

—श्रीनामदेव.

श्लोक.

प्रल्हादनारदपराशरपुंडरीक-।
व्यासांबरीषशुकशौनकभीष्मदाल्भ्यान् ॥
रुक्मांगदार्जुनवसिष्ठविभीषणादीन् ।
पुण्यानिमान्परमभागवतान्स्मरामि ॥ १ ॥

अभंग.

१

भक्तांमाजी अग्रगणी । पुंडलीक महामुनी ॥ १ ॥
त्याचे प्रसादें तरले । साधु संत उद्धरले ॥ २ ॥
तोचि प्रसाद आम्हांसी । विटेवरी हृषीकेशी ॥ ३ ॥
पुंडलीक बापमाय । दासी जनी वंदी पाय ॥ ४ ॥

२

निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम ॥
आवडिनें हीं नामें गातां ते नर पावति मंगलधाम ॥ १ ॥
रामदास जयराम रंगनाथ केशव आनंदमूर्ति बरे ॥
आवडिनें सन्नामें गातां ते नर होती दास खरे ॥ २ ॥
या लोकीं जे झाले असती भक्त हरीचे आवडते ।
ते केवळ हरिरूप तयांचीं नांवें घेणें आवडतें ॥ ३ ॥

३

"माझे भक्त मज अनुसरले चित्तें । त्याहूनी पढियंते मज आणिक नाहीं १
व्यक्तीस येणें मज तयांचिये आवडी । युगायुगीं प्रौढी हेंचि मिरवी

त्यांचेनी कृतार्थ असें मी पूर्णकाम । ते माझे परम प्राणसखे ॥ ३ ॥
ते माझे आश्रमीं मी त्यांचा विश्राम । जिहीं रूपनाम केलें मज ॥४॥
मी त्यांचा सोयरा ते माझे सांगाती । करीं त्या एकांतीं सुखगोडी ॥५॥
जिहीं तनुमनप्राण लाविला मजकडे । मी तयां आवडें जीवाहूनी ६
ते माझे भाग्याचे अधिकारी विभागी । वैकुंठ त्यालागीं वसतें केलें ७
त्यांचें गुणगौप्य मीच एक जाणें । माझी प्रेमखूण कळली तयां ॥८॥
मनाची साउली करुनियां मातें । भोगिती आतां तें सर्वसुख ॥ ९ ॥
आपुलियाचि किरणें विराजे गभस्ती । परी किरण न होती आन जेंवी
तैसे माझे दास मजमाजी उदास । असती समरस दुजेनवीण ॥११॥
मी तों भक्तरूप भक्त माझें स्वरूप । प्रभा आणि दीप जयापरी १२
हे खुण अनुभवीं जाणती ते ज्ञानी । ज्यां नाहीं आयणी कासयाची॥१३॥
त्यांचिये चरणींचें रज माझे नामें । जें सांडिलें रजतमें सत्वशीळ १४
त्यांचे भेटीलागीं हृदय कळवळे । कैं देखेन डोळे निवती माझे"॥१५

—नामदेव.

४

ब्रह्ममूर्ति संत जगीं अवतरले । उद्धराया आले दीन जनां ॥ १ ॥
ब्रह्मादिक त्यांचे वंदिती पायवणी । नाम घेतां वदनीं दोष जाती ॥२॥
हो कां दुराचारी विषयीं आसक्त । संतकृपें त्वरित उद्धरतो ॥ ३ ॥
अखंडित नामा त्याची वाट पाहे । निशिदिनिं ध्याये सत्संगती ॥४॥

५

उदार तुम्ही संत । मायबाप कृपावंत ॥ १ ॥
केव्हडा केला उपकार । काय वानूं मी पामर ॥ २ ॥
जड जीवा उद्धार केला । मार्ग दाविला सुपंथ ॥ ३ ॥
सेना म्हणे उतराई । होतां कांहीं दिसेना ॥ ४ ॥

६

तेचि एक संत जाणा । नारायणा आवडती ॥ १ ॥
पांडुरंगावांचुनि कांहीं । न जाणे पाहीं दुसरें ॥ २ ॥

मुखीं नाम अमृत वाणी । धाले मनीं डुल्लती ॥ ३ ॥
*सेना म्हणे पायीं माथा । त्यांच्या आतां ठेविला ॥ ४ ॥*

७

संता पोटीं देव वसे । देवा पोटीं संत असे ॥ १ ॥
ऐसा परस्परें मेळा । देव संतांचा अंकिला ॥ २ ॥
संताठायीं देव तिष्ठे । देव तेथें संत वसे ॥ ३ ॥
एकाजनार्दनीं संत । देव तयाचा अंकीत ॥ ४ ॥

८

संत जाती हरिकीर्तना । त्यांचे वाहिन मोचे वाहणा ॥ १ ॥
होंचि भवसिंधूचें तारूं ॥ तेणें उतरूं पैल पारू ॥ २ ॥
जन्मोजन्मींचें भेषज । ते हे संतचरणरज ॥ ३ ॥
संतचरणींच्या पादुका । झाला जनार्दनीं एका ॥ ४ ॥

९

संतांचिये माथा चरणावरी माझा । देहीं भाव दुजा नाहीं नाहीं ॥१
नामाचें चिंतन करिती सर्वकाळ । ते माझे केवळ मायबाप ॥ २ ॥
मायबाप म्हणों तरि लाजिरवाणें । चुकविलें येणें संतजनीं ॥ ३ ॥
ज्या ज्या जन्मा यावें मायबाप दोनी । परी संत निर्वाणीं मिळतीना ॥४॥
येचि देहीं डोळां देखिलें संतांसी । एकाजनार्दनीं वंदिले चरण त्यांचे ॥५

१०

विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ॥ १ ॥
आइकाजी तुम्ही भक्तभागवत । कराल तें हित सत्य करा ॥ २ ॥
कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचें ॥ ३ ॥
तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुखदुःख जीव भोग पावे ॥४॥

११

काय या संतांचे मानूं उपकार । मज निरंतर जागवीती ॥ १ ॥
काय द्यावें यांसी व्हावें उतराई । ठेवितां हा पायीं जीव थोडा ॥२॥
सहज बोलणें हितउपदेश । करूनि सायास शिकवीती ॥ ३ ॥
तुका म्हणे वत्स धेनूचिये चित्तीं । तैसें मज येती सांभाळीत ॥ ४ ॥

१२

जाणे भक्तीचा जिव्हाळा । तोचि दैवाचा पूतळा ॥ १ ॥
आणिक नये माझ्या मना । हो कां पंडित शाहणा ॥ २ ॥
नामरूपीं जडलें चित्त । त्यांचा दास मी अंकित ॥ ३ ॥
तुका म्हणे नवविध । भक्ति जाणे तोची शुद्ध ॥ ४ ॥

१३

नाचे टाळी पिटी । प्रेमें अंग धरणीं लोटी ॥ १ ॥
माझे सखे ते सज्जन । भोळे भाविक हरिजन ॥ २ ॥
न धरिती लाज । नाहीं देवासवें काज ॥ ३ ॥
तुका म्हणे दाटे । कंठ नेत्रीं जळ लोटे ॥ ४ ॥

१४

उजळलें भाग्य आतां । अवघी चिंता वारली ॥ १ ॥
संतदर्शनें हा लाभ । पद्मनाभ जोडला ॥ २ ॥
संपुष्ट हा हृदयपेटी । करूनि पोटीं सांठवूं ॥ ३ ॥
तुका म्हणे होता ठेवा । तो या भावा सांपडला ॥ ४ ॥

१५

वीर विठ्ठलाचे गाढे । कळिकाळ पायां पडे ॥ १ ॥
करिती घोष जयजयकार । जळती दोषांचे डोंगर ॥ २ ॥
क्षमा दया शांति । बाण अभंग हे हातीं ॥ ३ ॥
तुका म्हणे बळी । तेचि एक भूमंडळीं ॥ ४ ॥

१६

संतांचा महिमा तो बहु दुर्गम । शाब्दिकांचें काम नाहीं येथें ॥ १ ॥
बहु जड जरी झाली म्हैस गाय । तरी होईल काय कामधेनु ॥ २ ॥
तुका म्हणे अंगें व्हावें जें आपण । तरीच महिमान येईल कळों ॥३॥

१७

संतांचिये गांवीं प्रेमाचा सुकाळ । नाहीं तळमळ दुःखलेश ॥ १ ॥
तेथें मी राहीन होऊनि याचक । घालितील भीक तेचि मज. ॥ २ ॥

संतांचियें गांवीं वरो भांडवल । अवघा विठ्ठल धन वित्त ॥ ३ ॥
संतांचें भोजन अमृताचें पान । करिती कीर्तन सर्वकाळ ॥ ४ ॥
संतांचा उदीम उपदेशाची पेठ । प्रेमसुखसाठी देती घेती ॥ ५ ॥
तुका म्हणे तेथें आणिक नाहीं परी । म्हणोनी भिकारी झालों त्यांचा॥६

१८

काय वाणूं आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसे ॥ १ ॥
थोरीव सांडिली आपुली परीसें । नेणे शिवों कैसें लोखंडाशीं ॥२॥
जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टवीती उपकारें ॥३॥
भूतांची दया हें भांडवल संतां । आपुलिया ममता नाहीं देहीं ॥४॥
तुका म्हणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें स्रवतसे ॥ ५ ॥

१९

जे कां रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ॥ १ ॥
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंची जाणावा ॥ २ ॥
मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त ॥ ३ ॥
ज्यासी आपंगिता नाहीं । त्यासी धरी जो हृदयीं ॥ ४ ॥
दया करणें पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥ ५ ॥
तुका म्हणे सांगों किती । तोचि भगवंताची मूर्ती ॥ ६ ॥

२०

हिरा ठेवितां ऐरणीं । वांचे मारितां जो घणीं ॥ १ ॥
तोचि मोल पावे खरा । करणीचा होय चुरा ॥ २ ॥
मोहरा होय तोचि अंगें । सूत न जळे ज्याचे संगें ॥ ३ ॥
तुका म्हणे तोचि संत । सोसी जगाचे आघात ॥ ४ ॥

२१

भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास । गेले आशापाश निवारूनी ॥ १ ॥
विषय तो त्यांचा झाला नारायण । नावडे जन धन माता पिता ॥२॥
निर्वाणीं गोविंद असे मागें पुढें । कांहींच सांकडें पडों नेदी ॥ ३ ॥
तुका म्हणे सत्यकर्मा व्हावें साह्य । असत्यासी भय नरका जाणें ॥४॥

२२

ज्यासी माता परनारी । त्याचे मुखीं खरा हरी ॥ १ ॥
केलें पोटासाठीं ढोंग । तेथें कैंचा पांडुरंग ॥ २ ॥
ज्याला परधन विष । तोचि खरा हरिदास ॥ ३ ॥
तुका म्हणे सत्य सत्य । कृष्णपायांची शपथ ॥ ४ ॥

२३

अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ । त्याचे गळां माळ असो नसो ॥१॥
आत्मअनुभवीं चोखाळिल्या वाटा । त्याचे माथां जटा असो नसो
परस्त्रीचे ठायीं जो कां नपूंसक । त्याचे अंगा राख असो नसो ॥३॥
परद्रव्या अंध निंदेसी जो मुका । तोचि संत देखा तुका म्हणे ॥४॥

२४

धन्य तोचि प्राणी क्षमा ज्याचे अंगीं । न भंगे प्रसंगीं धैर्यबळ ॥१॥
न म्हणे कोणासी उत्तम वाईट । महत्व वरिष्ठ नसे जेथें ॥ २ ॥
अंतरीं सबाह्य सारिखें निर्मळ । हृदय कोमळ गंगारूप ॥ ३ ॥
तुका म्हणे काया कुरवंडीन तया । ठेवीन मी पायां मस्तक हें ॥४॥

२५

शुद्ध बीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥ १ ॥
मुखीं अमृताची वाणी । देह वेंचावा कारणीं ॥ २ ॥
सर्वांग निर्मळ । चित्त जैसें गंगाजळ ॥ ३ ॥
तुका म्हणे जाती । ताप दर्शनें विश्रांती ॥ ४ ॥

२६

तरीच संत म्हणावे । नेणे आपुले परावे ॥ १ ॥
भूतमात्रीं हरीवीण । न पाहेचि दूजेपण ॥ २ ॥
प्रेम अंतरीं निःसीम । मुखीं ज्याचे रामनाम ॥ ३ ॥
तुका म्हणे देहभाव । संतीं सोडियेला गांव ॥ ४ ॥

२७

जो कां भगवंताचा दास । तेणें असावें उदास ॥ १ ॥

कांय देतिल तेंचि घ्यावें । कोणा कांहीं न मागावें ॥ २ ॥
आशा कोणाची न करावी । बुद्धि भगवंतीं लावावी ॥ ३ ॥
सदा श्रवणमननें । आणि इंद्रियदमनें ॥ ४ ॥
नानापरी बोधुनि जीवां । आपुला परमार्थ साधावा ॥ ५ ॥
रामदासीं पूर्ण काम । बुद्धि दिली हे श्रीराम ॥ ६ ॥

२८

हरि गोपाळांसवें सकळां । भेटे गळ्यां गळा मेळवूनी ॥ १ ॥
भाविकें त्यांची आवडी मोठी । सांगे गोष्टी जीवींचिया ॥ २ ॥
योगियांच्या ध्याना जो नये । भाकरी त्यांच्या मागोनि खाये ॥३॥
*तुका म्हणे असे शाहाणीया दूरी । बोबडिया दासां हांका मारी ॥ ४ ॥

पदें.

१

संतपदाची जोड । दे रे हरी ॥ ध्रु० ॥
संतसमागमें आत्मत्वाचा । सुंदर उगवे मोड ॥ १ ॥
सुफलित करुनी पूर्ण मनोरथ । पुरविसि जिविंचें कोड ॥२॥
अमृत म्हणे रे हरि! भक्तांचा । शेवट करिसी गोड ॥ ३ ॥

२

प्राण्या! बोलावें बहु गोड ॥ ध्रु० ॥
दुष्टदुरुक्तीदुर्वचनाची । टाकुनि द्यावी खोड ॥ १ ॥
अंतर बाहिर नबादि साखर । सेविं सुखाची कोड ॥ २ ॥
अमृत म्हणे नरदेहा येउनि । संतसमागम जोड ॥ ३ ॥

३

सयांचे शब्द मनीं रुतले ॥ ध्रु० ॥
सुत   दारा गृहही त्यजिलें । भगवंतीं रतले ॥ १ ॥

*धाव .. मुखीं घास घाली माता । वैरी करी सत्ता शाहाणिया ॥ १ ॥
ऐसें जाणपणें पडिलें अंतर । वाढे तों तों थोर अंतराय ॥ २ ॥

हरिगुण गातां प्रेमजळानें । सर्वांगीं धुतले ॥ २ ॥
सुखोद्गार ते ब्रह्मरसाचे । अमृत म्हणे सांचले ॥ ३ ॥

४

ते धन्य जगदुद्धारी विद्वज्जन विजनविहारी ॥ ध्रु० ॥
भक्तांसीं भगवद्भजनें भवसागर मृगजलवत रे ।
चिद्विलास जगनग हेमीं वस्तुत्वें भेदातित रे ॥
अस्ति भातिप्रियरूप आत्मा तो नामरूपविरहित रे ॥
होउनियां अनुभव ऐसा हरिभजनीं अत्यद्भुत रे ॥ १ ॥
जाळिलें संचित समुळीं ज्ञानाग्नीमाजी निगुती ।
क्रियमाण पूर्वप्रवाहें विधिपूर्वक कर्मे घडती ॥
निर्हेतुक निरहंकारें ब्रह्मार्पण सहजचि होती ।
प्रारब्ध कलेवर भोगी साक्षी हा ईश्वरमूर्ती ॥ २ ॥
अहिकुंडलवत् तनु पाहतां संतोष विस्मय न वसे ।
तैसे या विद्वद्वर्या स्वरूपाहुनि आन न भासे ॥
मृत्तिकेवरी कुलाळें घट कोठुनि आणविलासे ।
रंगला या निजरंगीं निरतिशय सदनिं विलासे ॥ ३ ॥

# ६ वरप्रसाद.

**त्वत्पादकमले सक्ता भक्तिरेव सदास्तु मे ॥**

—अध्यात्मरामायण.

अभंग.

१

आकल्प आयुष्य व्हावें तया कुळा । माझिया सकळां हरिच्या दासा
कल्पनेची बाधा न हो कोणे काळीं । ही संतमंडळी सुखी असो ॥२॥
अहंकाराचा वारा न लागो राजसा । माझ्या विष्णुदासां भाविकांसीं
नामा म्हणे तया असावें कल्याण । ज्या मुखीं निधान पांडुरंग ॥३॥

२

जेथें जेथें मन जाईल हो माझें । तेथें तेथें तुझें रूप असे ॥ १ ॥
ऐसी मज सवे लावि निरंतरीं । जन्मजन्मांतरीं केशीराजा ॥ २ ॥
नामा म्हणे नको पाहों माझी लाज । संसाराचें बीज मूळ खूडी ॥३

३

पाहतां तुझे चरण हरली भवव्यथा । पुढली एक चिंता वाटतसे ॥१॥
म्हणी मुक्तिपद देसी पांडुरंगा । मग या संतसंगा कोठें पाहूं ॥ २ ॥
मग हे पंढरी आनंदसोहळा । कवणाचे डोळां पाहूं देवा ॥ ३ ॥
मग हे हरिकथा अमृतसंजीवनी । कवणाचे श्रवणीं ऐकों देवा ॥४॥
नामा म्हणे मज पंढरीची सोय । अनंतजन्म होय याचि लागीं ॥५॥

४

सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती । रखुमाईच्या पती सोयरीया ॥१॥
गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देईं मज प्रेम सर्वकाळ ॥ २ ॥
विठो माउलिये हाचि वर देईं । संचरोनि राहीं हृदयामाजी ॥ ३ ॥
तुका म्हणे कांहीं न मागें आणीक । तुझे पायीं सूख सर्व आहे ॥४॥

५

मज दास करी त्यांचा । संतदासांच्या दासांचा ॥ १ ॥
मग होत कल्पवरी । सुखें गर्भवास हरी ॥ २ ॥
नीचवृत्ति काम । परि मुखीं तुझें नाम ॥ ३ ॥
तुका म्हणे सेवे । माझे संकल्प वेंचावे ॥ ४ ॥

६

रामकृष्ण गोविंद नारायण हरी । केशवा मुरारी पांडुरंगा ॥ १ ॥
लक्ष्मीनिवासा पाहें दीनबंधु । तुझा लागो छंदु सदा मज ॥ २ ॥
तुझे नामीं प्रेम देईं अखंडित । नेणें तप व्रत दान कांहीं ॥ ३ ॥
तुका म्हणे माझें हेंचि गा मागणें । अखंडही गाणें नाम तुझें ॥ ४ ॥

७

हेंचि मागणें विठाबाई । पायीं ठेवूनियां डोई ॥ १ ॥
शांति दया अंतःकरणीं । रंगो रामनामीं वाणी ॥ २ ॥
मूळ द्वंद्वाचें विघडो । निजानंदीं वृत्ति जडो ॥ ३ ॥
तुका म्हणे हरी । आतां आपुलेसें करी ॥ ४ ॥

८

नीचपण बरवें देवा । नचले कोणाचाही हेवा ॥ १ ॥
महापूरें झाडें जाती । तेथें लव्हाळे वांचती ॥ २ ॥
येतां सिंधूच्या लहरी । नम्र होतां जाती वरी ॥ ३ ॥
तुका म्हणे कळ । पाय धरिल्या न चले बळ ॥ ४ ॥

९

सद्गदीत कंठ दाटो । येणें फुटो हृदय ॥ १ ॥
चिंतनाचा एक लाहो । तुमच्या अहो विठ्ठला ॥ २ ॥
नेत्रीं जळ वाहो सदा । आनंदाचे रोमांच ॥ ३ ॥
तुका म्हणे कृपादान । इच्छी मन हे जोडी ॥ ४ ॥

१०

देवा आतां ऐसा करीं उपकार । देहाचा विसर पाडीं मज ॥ १ ॥

तरीच हा जीव सुख पावे माझा । बरें केशीराजा कळों आलें ॥२॥
ठाव देईं चित्ता राखे पायापाशीं । सकळ वृत्तींशीं अखंडीत ॥ ३ ॥
आस, भय, चिंता, लाज, काम, क्रोध। तोडावा संबंध यांचा माझा॥
मागणें तें एक हेंचि आहे आतां । नाम मुखीं संतसंग देईं ॥ ५ ॥
तुका म्हणे नको वरपंग देवा । घेईं माझी सेवा भावशुद्ध ॥ ६ ॥

११

हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥
गुण गाईन आवडीं । हेंचि माझी सर्व जोडी ॥ २ ॥
नलगे मुक्ती धनसंपदा । संतसंग देईं सदा ॥ ३ ॥
तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हांसी ॥ ४ ॥

१२

ऐक रे विनंती मज नको तुझी मुक्ती ।
संतांचा हा संग हेंचि सूख आगळें ॥ ध्रु० ॥
वैष्णवाच्या घरीं प्रेमसूख इच्छा करी
ऋद्धि सिद्धि द्वारीं कर जोडूनि तिष्ठती ॥ १ ॥
वैकुंठींचा वास तया सुखा असे नाश ।
अद्भुत हा रस कथाकाळीं नामाचा ॥ २ ॥
नामाचा महिमा तुज न कळे पुरुषोत्तमा ।
तुका म्हणे आम्हां जन्म गोड यासाठीं ॥ ३ ॥

१३

ऐसा पुत्र देगा देवा । जग म्हणे त्याला बाबा ॥ १ ॥
कन्या तरी ऐसी देईं । जैसी मिरामुक्ताबाई ॥ २ ॥
ऐसा भक्तराज गुंडा । त्याचा तिहीं लोकीं झेंडा ॥ ३ ॥
इतकें न देववे गा तुझ्यानें । माझें करीं गा निसंतान॥४॥
दोहींमाजी एक लेखा । बोलो केवळ दास चोखा ॥ ५ ॥

श्लोक.

तो मोक्षही मज नसो श्रुतिसार साचा
जेथें नसे रस तुझ्या पदसारसाचा ।
तूझें सदुक्त चरितामृत देवराया !
ऐकेन मी अयुतकर्ण, दिजे वरा या ॥ १३ ॥

–वामनपंडित.

पद.

इतुकें दे मजला दे मजला । मागतसें हरि तुजला ॥ ध्रु० ॥
संतसमागम अर्चा । सारासारज्ञानचर्चा ॥ १ ॥
भगवद्भजनीं जागो । मन हें तुझिया स्वरूपीं लागो ॥ २ ॥
असेंचि वैभव देई । शिवदिन केसरिगुरुचे पायीं ॥ ३ ॥

श्लोक.

सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानीं पडो,
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो, ।
सदंघ्रिकमळीं दडो, मुरडितां हटानें अडो,
वियोग घडतां रडो, मन भवच्चरित्रीं जडो, ॥

न निश्चय कधीं ढळो, कुजनविघ्नबाधा टळो,
न चित्त भजनीं चळो, मति सदुक्तमार्गीं वळो ।
स्वतत्व हृदया कळो, दुरभिमान सारा गळो,
पुन्हां न मन हें मळो दुरित आत्मबोधें जळो ॥

द्यावें हेंचि विभो! अभीष्टवरदा! देवा! तुझीं पावलें
चित्तीं नित्य असोत, सर्व म्हणजे या याचका पावलें।
प्रेमें गाइन युष्मदद्भुतयशें नाचेन युष्मज्जनीं
पावो निर्वृति याद यादवपते! पाथोधिच्या मज्जनीं॥

–मोरोपंत.

ओंव्या.

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥ १ ॥

जे खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो ।
भूतां परस्परें जडो । मैत्र जीवांचें ॥ २ ॥

दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥ ३ ॥

वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूतळीं । भेटो तया भूतां ॥ ४ ॥

चलां कल्पतरूंचे अरव । चेतनां चिंतामणीचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥ ५ ॥

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ ६ ॥

किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होवोनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुषीं । अखंडीत ॥ ७ ॥

—ज्ञानेश्वरमहाराज.

श्लोक.

तो मोक्षही मज नसो श्रुतिसार साचा
जेथें नसे रस तुझ्या पदसारसाचा ।
तूझें सदुक्त चरितामृत देवराया !
ऐकेन मी अयुतकर्ण, दिजे वरा या ॥ १३ ॥

–वामनपंडित.

पद.

इतुकें दे मजला दे मजला । मागतसें हरि तुजला ॥ ध्रु० ॥
संतसमागम अर्चा । सारासारज्ञानचर्चा ॥ १ ॥
भगवद्भजनीं जागो । मन हें तुझिया स्वरूपीं लागो ॥ २ ॥
असेंचि वैभव देईं । शिवदिन केसरिगुरुचे पायीं ॥ ३ ॥

श्लोक.

सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानीं पडो,
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो, ।
सदंघ्रिकमळीं दडो, मुरडितां हटानें अडो,
वियोग घडतां रडो, मन भवच्चरित्रीं जडो, ॥

न निश्चय कधीं ढळो, कुजनविघ्नबाधा टळो,
न चित्त भजनीं चळो, मति सदुक्तमार्गीं वळो ।
स्वतत्व हृदया कळो, दुरभिमान सारा गळो,
पुन्हां न मन हें मळो दुरित आत्मबोधें जळो ॥

द्यावें हेंचि विभो ! अभीष्टवरदा ! देवा ! तुझीं पावलें
चित्तीं नित्य असोत, सर्व म्हणजे या याचका पावलें ।
प्रेमें गाइन युष्मदद्भुतयशें नाचेन युष्मज्जनीं
पावो निर्वृति याद यादवपते ! पाथोधिच्या मज्जनीं ॥

–मोरोपंत.

ओंव्या.

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥ १ ॥

जे खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो ।
भूतां परस्परें जडो । मैत्र जीवांचें ॥ २ ॥

दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यो पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥ ३ ॥


वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूतळीं । भेटो तया भूतां ॥ ४ ॥

चलां कल्पतरूंचे अरव । चेतनां चिंतामणीचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥ ५ ॥

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ ६ ॥

किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होवोनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुषीं । अखंडीत ॥ ७ ॥

—ज्ञानेश्वरमहाराज.



# धन्यता.

पद.

आनंदरस हा प्याला । भवतापशांतचि झाला ॥ ध्रु० ॥
अनंतकोटी कल्मषपाश । पावे एका समयिं विनाश ।
दृढ धरितां सद्गुरुची कास । निजगुज सांगुनि गेला ॥ १ ॥
आतां मज हो कैचें ध्यान । विसरुनि गेलें समुळीं भान ।
श्रवण कराया नाहीं मज कान । संकल्पचि निमाला ॥ २ ॥
मेली यद्यपि आहे माय । केला जीणें दृढ व्यवसाय ।
रामसखा तो शोकेल काय । चिन्मय होउनि ठेला ॥ ३ ॥

सखारामबोवा कवाडकर.

अभंग.

१

आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां । तो जाहला सोहळा अनुपम्य ॥
आनंदें दाटलीं तिहीं त्रिभुवनें । सर्वात्मकपणें भोग झाला ॥ २ ॥
एकदेशी होतों अहंकारें आथिला । त्याच्या त्यागें झाला सुकाळ हा
फिटलें सुतक जन्ममरणांचें । मी माझ्या संकोचें दूरी झालों ॥ ४ ॥
नारायणें दिला वसतीस ठाव । ठेवूनीयां भाव ठेलों पायीं ॥ ५ ॥
तुका म्हणे दिलें उमटूनी जगीं । घेतलें तें अंगीं लावूनीयां ॥ ६ ॥

२

प्रेमाच्या अमृतें रसना ओलावली । मनाची राहिली वृत्ति पायीं १
सकळही तेथें वोळलीं मंगळें । वृष्टि केली जळें आनंदाच्या ॥ २ ॥
सकळ इंद्रियें जालीं ब्रह्मरूप । ओतलें स्वरूप तयामाजी ॥ ३ ॥
तुका म्हणे जेथें वसे भक्तराव । तेथें नांदे देव संदेह नाहीं ॥ ४ ॥

३

याजसाठीं केला होता अटाहास । शेवटचा दिस गोड व्हावा ॥ १ ॥
आतां निश्चितीनें पावलों विसांवा । खुंटलिया धांवा तृष्णेचिया ॥२॥
कवतुक वाटे जालिया वेंचाचें । नांव मंगळाचें तेणें गुणें ॥ ३ ॥
तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी । आतां दिवस चारी खेळीमेळीं ४

# ७ अमृतबिंदु.

( श्रीज्ञानेश्वर, श्रीतुकाराम व श्रीरामदास यांच्या मुखगंगेतून स्त्रवलेले. )

## १ ज्ञानेश्वर.

( १ ) हें उपजे आणि नाशे । तें मायावशें दिसे ।
येरवीं तत्वता वस्तु जें असे । तें अविनाशचि ॥

( २ ) या उपाधिमाजी गुप्त । चैतन्य असे सर्वगत ।
तें तत्वज्ञ सतत । स्वीकारिती ॥

( ३ ) अर्जुना समत्व चित्तार्चे । तेंचि सार जाण योगाचें ॥

( ४ ) जंव निरार्तता नाहीं । तंव व्यापार असे पाहीं ।
मग संतुष्टच्या ठायीं । खुंटे सहजें ॥

( ५ ) म्हणोनि जें जें उचित । आणि अवसरेंकरूनि प्राप्त ।
तें कर्म हेतुरहित । आचरें तूं ॥

( ६ ) म्हणोनि स्वधर्मे जें अर्जे । तें स्वधर्मेचि विनियोगिजे ।
मग उरे ते भोगिजे । संतोषेंशीं ॥

( ७ ) हें संपत्तिजात आघवें । हवनद्रव्य मानावें ।
मग स्वधर्मयज्ञें अर्पावें । आदिपुरुषीं ॥

( ८ ) एथ वडिल जें जें करिती । तया नाम धर्म ठेविती ।
येर तेंचि अनुष्ठिती । सामान्य सकळ ॥

( ९ ) मार्गाधारें वर्तावें । विश्व हें मोहरें लावावें ।
अलौकिक नोहावें । लोकांप्रती ॥

( १० ) दैवास्तव पाळण । जो चिंतीना देहभरण ।
तो महायोगी जाण । दैवयोगें ॥

( ११ ) जयांचें ऐहिक धड नाहीं । तयांचें परत्र पुससी काई ॥

( १२ ) शून्य जैसें गृह । कां चैतन्येंवीण देह । तैसें जीवत तें संमोह । ज्ञानहीन ॥

( १३ ) म्हणोनि कल्पना जैं सांडे । तैंचि गा संन्यास घडे ॥

( १४ ) जैसा किडाळाचा दोष जाये । तरी पंधरें तैंचि होये ।
तैसें जीवा ब्रह्मत्व आहे । संकल्पलोपीं ॥

( १५ ) कां जे मार्गामार्ग देखावे । साच लटिके वोळखावें ।
हिताहित जाणावें । हिताचिलागीं ॥

( १६ ) म्हणोनि थोरपण पऱ्हां सांडिजे । एथ व्युत्पत्ति आघवी विसरिजे ।
जैं जगा धाकुटे होइजे । तैं जवळिक माझी ॥ १८ ॥

( १७ ) तैसें उत्तमत्व तैंचि तरे । तौंचि सर्वज्ञता सरे ।
जैं मनोबुद्धि भरे । माझोनि प्रेमें ॥

( १८ ) म्हणोनि भक्ति गा एथ सरे । जाति अप्रमाण ॥

( १९ ) मी कवण पां केतुला । कवणाचा कैं जाहला ।
या निरुती करितां बोला । कल्प गेले ॥

( २० ) विषयविषाचा पडिपाडू । गोड परमार्थ वाटे कडू ।
कडू विषय तो गोडू । जीवासी जाहला ॥

( २१ ) नवल अहंकाराची गोठी । विशेषें नलगे अज्ञानापाठी ।
सज्ञानाचे झोंबे कंठीं । नाना संकटीं नाचवी ॥

( २२ ) येरवीं तरी पांडुसुता । अंतर शुद्ध नसतां ।
बाहेरि कर्म तो सर्वथा । विटंबू गा ॥

( २३ ) नामरूप संबंध । जातिक्रियाभेद । हा आकारासीच प्रवाद । वस्तूसि नाहीं ॥

( २४ ) पैं शून्य जैं दावावें जाहलें । तैं बिंदुलें एक केलें ।
तैसें अद्वैत सांगावे बोलें । तैं द्वैत कीजे ॥

( २५ ) तैसा चित्तीं अहंते ठावो । आणि जिभे सकलशास्त्राचा सरावो ।
ऐसेनि कोडी एक जन्म जावो । परी न पविजे मातें ॥

( २६ ) तैसा स्वरूपाचिया प्रसरा—। लागीं प्राणेंद्रियशरीरा ।
आटणी करणें जें वीरां । तेंचि तप ॥

( २७ ) शास्त्र म्हणेल जें सांडावें । तें राज्यही तृण मानावें ।
जें घेववी तें न म्हणावें । विषही विरु०॥

( २८ ) पैं अहितापासूनि काढिती । हित देऊनि वाढविती ।
नाहीं श्रुतीपरौती । माउली जगा ॥

( २९ ) तैसा श्रीगुरु प्रसन्न होये । शिष्य वियाही कीर लाहे ।
परी ते फळे संप्रदायें । उपासिलिया ॥

## २ तुकाराम.

( ३० ) असाध्य तें साध्य करितां सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ॥

( ३१ ) देवभक्तपण । तुका म्हणे नाहीं भिन्न ॥

( ३२ ) विधीनें सेवन । विषयत्यागातें समान ॥

( ३३ ) नलगे हा लौकीक सांडावा वेव्हार । घ्यावें वनांतर भस्म दंड ॥

( ३४ ) सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वताएवढें ॥

( ३५ ) न फळे उत्तर । नाहीं स्वामी जो सादर ॥

( ३६ ) करावी ते पूजा मनेंचि उत्तम । लौकिकाचें काम काय असे ॥

( ३७ ) अवघी एकाचीच वीण । तेथें कैंचें भिन्नाभिन्न ।

( ३८ ) वैष्णव तो जया । अवघी देवावरी माया ॥

( ३९ ) तुझें आहे तुजपाशीं । परि तूं जागा चुकलासी ।
चिवडूनीयां नासी । तुझ्या घरच्यांनीं केली ॥

( ४० ) विश्वासाची धन्य जाती । तेथें वस्ती देवाची ॥
तुका म्हणे भोळीयाचा । देव साचा अंकित ॥

( ४१ ) देव सारावे परते । संत पूजावे आरते ॥

( ४२ ) नलगे सांडावा आश्रम । उपजले कुळींचे धर्म ।
आणिक न करावे श्रम । पुरे एक नाम विठोबाचें ॥

( ४३ ) भेद नाहीं सर्वात्मना । नारायणा तुज मज ॥

( ४४ ) तुज वर्णी ऐसा तुजविण नाहीं । दुजा कोणी तिहीं त्रिभुवनीं ॥

( ४५ ) तुका म्हणे करूनि दावी । त्याचे पाय माझे जीवीं ॥

( ४६ ) भाव तैसें फळ । न चले देवापाशीं बळ ॥

( ४७ ) वर्णाश्रम करिसी चोख । तरी तूं पावसी उत्तम लोक ॥

( ४८ ) द्रव्याचिया मागें कळिकाळाचा लाग । म्हणोनियां संग खोटा त्याचा ॥

४९ ) विटाळ तो परद्रव्य परनारी । येथुनी जो दुरी तो सोवळा ॥

( ५० ) साधुसंत येती घरा । तोचि दिवाळी दसरा ॥

( ५१ ) तुका म्हणे भाव असतां नसतां । सायास करितां वायां न वजे ॥

( ५२ ) देव जोडे ते करावे अधर्म । अंतरे तें कर्म नाचरावें ॥

( ५३ ) पोटापुरतें काम । परी अगत्य तो राम ॥

( ५४ ) आला भागासी तो करी वेवसाय । परी राहो भाव तुझ्या पायीं ॥

( ५५ ) दया क्षमा शांती । तेथें देवाची वसती ॥

( ५६ ) तुका म्हणे कांहीं नाहीं नेमावीण । मोकळा तो सीण दुःख पावे ॥

( ५७ ) आशाबद्ध तो जगाचा दास । पूज्य तो उदास सर्वजनां ॥

( ५८ ) सत्यसंकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ॥

( ५९ ) तुका म्हणे हरिच्या दासा । शुभकाळ दाही दिशा ॥

( ६० ) मन हें निश्चळ झालें एक ठायीं । तयां उणें काई निजसुखा ॥

( ६१ ) ब्रह्मरस करूं भोजनपंगती । संतांचे संगती सर्वकाळ ॥

( ६२ ) आमुचा स्वदेश । भुवनत्रयामध्यें वास ॥

( ६३ ) चित्त शुद्ध जरी शत्रु मित्र होती । व्याघ्र हे न खाती सर्प तया ॥

( ६४ ) कासया गुणदोष पाहों आणिकांचे । मज काय त्यांचें उणें असे ॥

( ६५ ) वाचे विठ्ठल नाहीं । तोचि प्रेतरूप पाहीं ॥

( ६६ ) पवित्र तो देह वाणी पुण्यवंत। जो वदे अच्युत सर्वकाळ ॥

( ६७ ) प्रेम अमृताची धार । वाहे देवाही समोर ॥

( ६८ ) भक्तीच्या उत्कर्षे । नाहीं मुक्तीचें तें पिसें ॥

( ६९ ) वासनेची बुंथी । तेथें कैंची ब्रह्मस्थिती ॥

( ७० ) निश्चयाचें बळ । तुका म्हणे तेंची फळ ॥

( ७१ ) तरीच जन्मा यावें । दास विठ्ठलाचें व्हावें ॥
नाहीं तरी काय थोडीं । श्वान सूकरें बापुडीं ॥

( ७२ ) भूतदया ज्याचे मनीं । त्याचे घरीं चक्रपाणी ॥

( ७३ ) पवित्र तें अन्न । हरिचिंतनीं भोजन ॥

( ७४ ) म्हणे देवासी पाषाण । तुका म्हणे भावहीन ॥

( ७५ ) ओले मातीचा भरंवसा । काय मानिसी माणसा ॥

( ७६ ) स्त्रिया धन बहु खोटें । नागविले मोठे मोठे ॥

( ७७ ) हरिहरां भेद । नाहीं नका करूं वाद ॥

( ७८ ) पवित्र तें कूळ पावन तो देश । जेथें हरिचे दास जन्म घेती ॥

( ७९ ) बोले तैसा चाले । त्याचीं वदावीं पाउलें ॥

( ८० ) नाना मतांतरें शब्दांची व्युत्पत्ती । पाठांतरें होती वाचाळ ते ॥

( ८१ ) सांपडे हा देव भाविकांचे हातीं । शाहाणे मरती तरी नाहीं ॥

( ८२ ) करावे सायास आपुल्या हिताचे । तेथें आलियाचें मनुष्यपण ॥

( ८३ ) बोलाचीच कढी बोलाचाची भात । जेवूनियां तृप्त कोण झाला ॥

( ८४ ) मुखीं नाम हातीं मोक्ष । ऐसी साक्ष बहुतांशीं ॥

( ८५ ) दाता नारायण । स्वयें भोगिता आपण ॥

( ८६ ) पवित्र सोवळीं तींच एक भूमंडळीं ।
ज्यांचा आवडता देव अखंडित प्रेमभाव ॥

( ८७ ) तुका म्हणे थोडें आहे । आली उर्मी साहुनि राहें ॥

( ८८ ) दया क्षमा शांती । तेथें देवाची वसती ॥ १ ॥

## ३ ( रामदास )

( ८९ ) असो भगवत्प्राप्तीवीण । करी संसाराचा शीण ।
त्या मूर्खाचें मुखावलोकन । करूंच नये ॥

( ९० ) पुत्र कलत्र आणि दारा । इतुकाचि मानुनीयां थारा ।
विसरोनि गेला ईश्वरा । तो एक मूर्ख ॥ २ ॥

( ९१ ) नरदेहाचें उचित । कांहीं करावें आत्महित ।
यथानुशक्त्या चित्तवित्त । सर्वोत्तमीं लावावें ॥ ९३ ॥

( ९२ ) संसारदुःख विसरवी । भक्तिमार्ग विमल दावी ।
भजनक्रिया जो उपजवी । तो सत्वगुण ॥ ४ ॥

( ९३ ) मूर्खांमाजी परम मूर्ख । जो संसारीं मानी सुख ।
या संसारदुःखाएवढें दुःख । आणीक नाहीं ॥ ५ ॥

( ९४ ) जो अन्न देतो उदरासी । शरीर विकावें लागे त्यासीं ।
जेणें घातलें जन्मासीं । त्यासि कैसे विसरावें ॥ ६ ॥

( ९५ ) जो संसारदुःखें दुखवला । जो त्रिविधतापें पोळला ।
तोचि अधिकारी झाला । परमार्थासी ॥ ७ ॥

( ९६ ) सद्गुरुहूनि देव मोठा । जयास वाटे तो शिष्य करंटा

( ९७ ) संसारसंगें दुःख न जाहलें । ऐसें देखिलें ना ऐकिलें

( ९८ ) छपन्न भाषा तितुके ग्रंथ । आदि करूनि वेदांत ।
या इतुक्यांचा गहनार्थ । एकचि असे ॥

( ९९ ) जो जाणेल भगवंत । तया नांव बोलिजे संत ।
जो शाश्वत आणि अशाश्वत । निवाडा करी ॥

( १०० ) पोट भरायाची विद्या । तियेसि म्हणों नये सद्विद्या ।
सर्वव्यापक वस्तु सद्या । पाविजे तें ज्ञान ॥

( १०१ ) मी थोर वाटे मनीं । तो नव्हे ब्रह्मज्ञानी ।

( १०२ ) संसारत्याग न करितां । प्रपंच उपाधी न सांडतां ।
जनांमध्यें सार्थकता । विचारेंचि होय ॥

( १०३ ) गुप्त तेंचि प्रकटवावें । असाध्य तेंचि साधावें ।
कानडेंचि अभ्यासावें । निरंतर ॥

( १०४ ) देहबुद्धीच्या अंतीं । सकळांसि एकच प्राप्ती ।

( १०५ ) प्रीतीचें लक्षण ऐसें । अंतरीं उठे अनायासें ।
पाणी पाणवाटे जैसें । आपणाचि धांवे ॥

( १०६ ) बहुत प्रकारें पाहतां । ग्रंथ नाहीं अद्वैतापरता ।

( १०७ ) परी परत्र साधनेंवीण । म्हणों नये तें श्रवण ।
जेथें नाहीं आत्मज्ञान । तया नांव करमणूक ॥

( १०८ ) सांडील-सगुण भजनासी । तो ज्ञाता परी अपेशी ।
म्हणोनि सगुण भजनासी । सांडूचि नये ॥

( १०९ ) ऐका सदैवपणाचें लक्षण । रिकामा जाऊं नेदी क्षण ।

( ११० ) अरे हें पाहिलेंचि पाहावें । विवरलेंचि मागुती विवरावें ।
वाचिलेंचि वाचावें । पुनः पुन्हां ॥

( १११ ) अखंड एकांत सेवावा । अभ्यासचि करीत जावा ।
काळ सार्थकाचि करावा । जनासहित ॥

( ११२ ) प्रपंचीं जो सावधान । तोच परमार्थ करील जाण ।
प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ॥

( ११३ ) वैराग्यापरतें नाहीं भाग्य । वैराग्य नाहीं तें अभाग्य ।

( ११४ ) वेडे करावे शाहाणे । तरीच जिणें श्लाघ्यवाणें ।

( ११५ ) विभक्तपणें राहावें । आणि भक्तचि म्हणावें ।
हें अवघेंचि जाणावें । विलक्षण ॥

( ११६ ) प्रपंचीं सुवर्ण । परमार्थी पंचीकरण ।

( ११७ ) जिकडे जग तिकडे जगन्नायक ।

( ११८ ) नित्यनेम दृढचित्तीं । तेणें शुद्ध चित्तवृत्ती । होवोनि भगवंतीं । मार्ग फुटे ॥

( ११९ ) पदार्थज्ञानाचा बडिवार । त्याहूनि थोर ईश्वर ।

( १२० ) साधनेंवीण ब्रह्मज्ञान । तेणें बुडे समाधान ।
अंगीं जडे देहाभिमान । वाचाळपणें ॥

( १२१ ) ज्ञान झालें भक्तजना । सांडूं नये उपासना ॥

( १२२ ) प्राणी संसारासी आला । तितुका मृत्युपंथें गेला ॥

( १२३ ) दु:खमूळ हा संसार । तयामध्यें भक्ति सार ॥

( १२४ ) जो जो प्रयत्न रामावीण । तो तो दु:खासी कारण ॥

( १२५ ) गुण गाती भगवंताचे । तेचि जाणावे दैवाचे ॥

( १२६ ) ज्ञानावीण जी जी कळा । ती ती जाणावी अवकळा ॥

( १२७ ) हरिभक्तिवीण जाऊं नये क्षण । या नांव लक्षण सार्थकाचें ॥

( १२८ ) विधिनें विषयां घ्यावें अविधी नसतां बरें ।
आश्रमीं न्यायनीतीनें प्रपंच करणें सुखें ॥

( १२९ ) जेथें बहु विचार । तेथें ईश्वरअवतार ।
मागें झाले थोर थोर । धक्के चपेटे सोसोनी ॥

( १३० ) करूं नये गुणदोषउठाठेवी । विवेकें लावावी बुद्धि मना ॥

( १३१ ) सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील त्याचें ।
परंतु आधीं भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥

REFBK-0000219
REFBK-0000219
२१९